महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

विशेषांक
वर्ष-७ अंक-७
डिसेंबर २०१२ - फेब्रुवारी २०१३

**प्रिय कर्मचारी बंधू-भगिनींनो,**

२०१२-१३ या आर्थिक वर्षातील चांगल्या कामगिरीबद्दल मी आपल्या सर्वांचं अभिनंदन करतो. महापारेषण कंपनीची आर्थिक कामगिरी सातत्याने चांगली राहिली आहे त्यासाठी मी राज्य सरकार आणि महावितरण तसेच महानिर्मिती या आपल्या सहयोगी कंपन्यांनाही धन्यवाद देतो. वीजेची निर्मिती आणि वीजेचे वितरण यामध्ये योग्य तो समन्वय ठेवणे गरजेचे आहे म्हणूनच आपल्या कंपनीला वीजनिर्मिती व वीजवितरण यांच्यातील " महत्त्वाचा दुवा " समजले जाते.

आपली चांगली कामगिरी ही आपल्या कंपनीचे ध्येय आणि उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून केलेल्या सर्वंकष प्रयत्नांचा परिणाम आहे. आपल्या विविध परिमंडलांमध्ये हॉटलाईन मेंटेनन्स युनिट स्थापन करुन खर्चाच्या बचतीत आपण यशस्वी झालो आहोत. अन्यथा बाहेरच्या एजन्सीकडून HLM चे काम करुन घेण्यात मोठा खर्च झाला असता. सध्या आपली हॉटलाईन युनिट्स वीजेच्या चालू प्रवाहात कामे हाताळण्यासाठी सक्षम आहेत. त्यामुळे सक्तीच्या आउटेजमुळे बुडणारा महसूल वाचवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. मंकी पॅट्रोलिंग, थर्मो व्हिजन स्कॅनिंग यांसारख्या नवनवीन सुव्यवस्थापन पद्धतींमुळे आपल्या भांडवली गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत आहे. प्रकल्पाच्या कामांचा योग्य आढावा तसेच देखरेखीमुळे आपल्या Turnkey/EPC भागीदारांवर योग्य नियंत्रण ठेवणे शक्य होत आहे. मानव संसाधन विभाग कर्मचारी आकृतिबंधाचा आढावा घेऊन गरजेनुसार मनुष्यबळाचा वापर करीत आहे.

जेव्हा मी भविष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपली कंपनी प्रगतिपथावर राहण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागेल असे दिसते. सध्या ऊर्जा क्षेत्रात जे बदल होत आहेत त्यामुळे आपल्यापुढे अनेक आव्हाने उभी राहणार आहेत. बदल हे सर्वदूर पसरत आहेत आणि त्यामुळे व्यवसायाचे नियम जलद गतीने बदलत आहेत. जे आज योग्य वाटते, ते उद्या योग्य असेलच असे नाही. अशी स्थितीचा आपल्यावर विपरित परिणाम होऊ शकतो मात्र त्यावर मात करण्यासाठी कामे नियोजनपूर्वक करण्याची तसेच योग्य अंदाज बांधण्याची व उत्तम तांत्रिक-व्यावहारिक ज्ञान आत्मसात करण्याची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक शिस्तीची गरज आहे.

बदलाच्या या अवस्थेत यशस्वी होण्यासाठी आर्थिक शिस्त हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपली शिस्त आणि प्रयत्नच आपला महसूल आणि मिळकत ठरवतील. महापारेषण कंपनीत आपण लक्षणीय वेळ आर्थिक शिस्त लावण्यात खर्च केला आहे. यासंदर्भात दिलेल्या सूचनांचं काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे. कधीकधी सूचनांचं उल्लंघन झाल्याचं माझ्या निदर्शनास येते. कार्यादेशाची उचित तपासणी करणे गरजेचे आहे. त्यासाठी यंत्रणेत विविध टप्प्यांवर पडताळणी व्यवस्था निर्माण करायला हवी.



ईआरपीच्या या युगात आपले व्यवहार तसेच कार्यादेश आपण प्रणालीमध्ये थेट पाहू शकतो. जर मला एखादा व्यवहार पुरेशा समर्थनाअभावी आणि दिलेल्या सूचनांचं पालन न करता केलेला आढळला, तर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात मी मागेपुढे पाहणार नाही. कुठलाही वाढीव खर्च, असमर्थनीय, बेकायदा व्यवहार हा ग्राहकासाठी म्हणजेच सामान्यजनांसाठी भार आहे हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे आणि या गोष्टी कधीही होऊ नयेत याची काळजीही आपण घेतली पाहिजे. माझ्या अधिकाऱ्यांना अशा गोष्टींचे गंभीर परिणाम तसेच सार्वजनिक जीवनातील त्यांची भूमिका माहित असेल याची मला खात्री आहे.

अलीकडच्या काळात इन्व्हेंटरी कंट्रोल तसेच खरेदीसंदर्भात आपण काटेकोर सूचना दिल्या आहेत. गरजेनुसार कुठलीही नवीन खरेदी करताना अस्तित्वात असलेल्या साधनांचा /वस्तूंचा प्रथम उपयोग व्हायला हवा. परिमंडलांनी टेंडरिंग, प्रस्तावित खर्चवाढीसंदर्भातील सूचनांचे काटेकोर पालन करावे. टेंडरिंग प्रक्रियेत किंमत वाढल्यास त्याकरिता संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रशासकीय परवानगीसाठी क्षेत्रीय तसेच सांघिक कार्यालयातील विविध अधिकाऱ्यांना दिलेल्या आर्थिक मर्यादांचं पालन होणे गरजेचे आहे. आपल्या वित्त व लेखा विभागाने संबंधित तांत्रिक विभागांच्या सहाय्याने तांत्रिक व वित्तीय विषयांची योग्य तयारी करुन व सातत्याने पाठपुरावा करुन एमईआरसीने मंजूर न केलेल्या एआरआरवर पुनर्दावा करण्यात यश मिळवले आहे. अशा प्रकारची कामगिरी ते यापुढेही करतील अशी मला खात्री वाटते.

महापारेषण कंपनी सध्याच्या स्थित्यंतराला समर्थपणे सामोरी जाताना मला पाहायचंय. त्यासाठी आपण आर्थिक शिस्तीचे पालन केले पाहिजे आणि आपल्या प्रयत्नांना योग्य दिशा दिली पाहिजे. चला, आपण सर्वांना विश्वासार्ह, अखंडित तसेच वाजवी दरात वीज देण्याच्या आपल्या उद्दिष्टाकरिता कटिबद्ध होऊया. याबाबतीत तुमच्या काही सूचना/अभिप्राय असतील तर मला जरुर या पत्यावर कळवा : md@mahatransco.in.

धन्यवाद !!!

**अरविंद सिंह**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

Dear Colleague,

I congratulate all for our good financial results for the year 2012-2013. Consecutively, MSETCL is giving good financial performance. I equally thank the State Government and our sister companies, Mahagenco and Mahadiscom for their co-operation and support. It is important to be integrated with our upstream and downstream facilities and that is why we are rightly known as the Vital Link between the points of generation and the point of distribution.

Our good performance is the result of proper diagnosis and concentrated efforts which were linked to the organization's vision, mission and objectives. By establishing Hot Line Units across the Zones we have been able to save substantial expenses which used to be incurred by getting work done from the outside agencies. Now our Hot Line Units are capable of handling maintenance work on live conductors. Thus, loss of revenue due to compulsory outage has been reduced substantially. Innovative maintenance practices such as predictive maintenance, monkey patrolling, thermo-vision scanning, etc are giving us good dividends on our capital investment. We have been able to exercise good control over our technical partners such as third party agencies and Turnkey/EPC companies by putting in place stringent review and monitoring mechanism in respect of project work. On the HR front as well, we are able to redeploy manpower judiciously from one site to another as per requirements.

When, I look in the future in respect to continuing our growth trajectory. I feel that the power sector is undergoing transformation which throws many challenges before us. The reforms are wide spread and they are changing the rules of the game overnight. What is relevant today may not be pertinent tomorrow. Such a situation makes us vulnerable and therefore demands proactive action, good forecasting, sound techno-commercial knowledge and most importantly financial discipline.

Financial discipline is the key success factor in the transformation phase. It is our discipline and efforts which will govern our top line and bottom line i.e. income and profits. In MSETCL we have spent considerable time on exercising financial discipline. The guidelines given in this regard require to be followed meticulously. Sometime, I come across tendencies to bypass these guidelines. The work orders are to be monitored scrupulously and for that purpose we must build proper check and balances in the system.

In the era of ERP, we are now able to check all transactions and work orders live in the system. If I find any transaction without proper justification and breach of the guidelines given in respect of financial discipline, I shall not hesitate to take strict action. We must keep in mind that any excess, unjust, unlawful and unreasonable transaction will ultimately burden the customer i.e. the common citizen and we must ensure such things never happens. I am sure that my officers are aware of the consequences and their role in public life.

In recent times, we have given strict guidelines regarding inventory control and procurement. The existing inventories are to be utilized before proceeding for need based procurement. The field has to follow guidelines regarding tendering/ estimates escalation. The approval of the concerned authorities as mentioned in the guidelines are required to be taken before issuing work order in respect of upward revision in the price quoted in bids. The financial limit set for administrative approval by various authorities of the Field and Corporate Office has to be observed. I have seen that our Finance and Accounts Department, in coordination with concerned technical departments have succeeded in reclaiming the ARR sanctioned from MERC by proper follow-up and rigorous technical and financial preparation. I am sure they will continue to do so in the future too.

I would like to see MSETCL leveraging from this transformation. However, we need to be disciplined and take focused efforts in the right direction. Let us commit to our mandate of providing reliable, uninterrupted and affordable Power to All. Any suggestions in this regard can be sen to me at: md@mahatransco.in.

Thank you,

**Arvind Singh**
**Chairman and Managing Director**



महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव श्री.जयंतकुमार बांठिया यांनी नुकतीच सांघिक कार्यालयाला भेट दिली. त्याप्रसंगी त्यांचे स्वागत करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह.

## पुणे परिमंडलांतर्गत जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राला खासदार सौ.सुप्रिया सुळे यांची सदिच्छा भेट



पुणे परिमंडलांतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र जेजुरी येथे खासदार सौ.सुप्रिया सुळे यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासमवेत पुणे जिल्हा विद्युत समन्वय समितीचे सदस्य श्री.प्रविण शिंदे उपस्थित होते. पारेषण कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांनी चालू वाहिनीवरील इन्सुलेटर बदलणे व पंक्चर्ड इन्सुलेटर डिटेक्शन चाचणीच्या कामाची पाहणी करून महिला कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय व धाडसी कामाचे कौतुक केले.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.प्रभाकर देवरे यांनी खासदार सौ.सुप्रिया सुळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री.अनिल कोलप, जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री.शशिकांत बाकरे, उपकार्यकारी अभियंता श्री.गिरीश पंतोजी व श्री.प्रशांत पाटील व त्यांचे सहकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.राहुल सुतार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) व श्री. भिमाशंकर पोहेकर यांनी केले.

## महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचा वर्धापन दिन सोहळा संपन्न



महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेच्या १५व्या वर्धापन दिन सोहळ्याचे स्वयंचलित कळीद्वारे दीप प्रज्वलित करून उद्घाटन करताना तत्कालीन ऊर्जामंत्री ना.श्री.राजेश टोपे, सोबत आ.एम.एम. शेख, महापारेषण कंपनीचे कार्यकारी संचालक (संचलन/मासं) श्री.एस.जी. केळकर, संघटनेचे सरचिटणीस सय्यद जहिरोद्दीन व इतर मान्यवर.

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांची औरंगाबाद परिमंडलांतर्गत ४०० केव्ही थापटी तांडा उपकेंद्रास भेट



महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी १५ जानेवारी रोजी औरंगाबाद परिमंडलातील ४०० केव्ही थापटी तांडा (औरंगाबाद-२) येथे नव्याने उभारल्या जात असलेल्या उपकेंद्रास भेट देऊन कामाची पाहणी केली व कामाचा वेग वाढवण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

औरंगाबाद हे महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून नावारुपास येत आहे. येथे नजीकच्या काळात औद्योगिक क्षेत्रात झपाट्याने वाढ अपेक्षित आहे. त्या दृष्टीने वीजेची उपलब्धता वाढावी आणि औद्योगिक क्षेत्राला वीजेचा कोणत्याही प्रकारचा तुटवडा भासू नये यास्तव महापारेषण कंपनीने वाळुज ४०० केव्ही उपकेंद्रा व्यतिरिक्त थापटी तांडा येथे औरंगाबाद-२ या नावाने ४०० केव्हीचे नवीन उपकेंद्र मंजूर केले असून त्याचे काम प्रगतिपथावर आहे.

या कामाची अंदाजित किंमत ११८.७४ कोटी असून, यामध्ये ५०० एमव्हीएचे २ रोहित्र, ४०० केव्ही भुसावळ ते वाळुज या नवीन विद्युतवाहिनीवर थापटी तांडा येथे ९९ किमीची एक व ७७ किमीची दुसरी विद्युतवाहिनी मंजूर असून सर्किट-१ चे काम प्रगतीपथावर आहे. तसेच ४०० किमी. DCDC लाईन थापटी तांडा ते बाभळेश्वर या १२२ किमी. क्वॉडलाईनचे कामसुद्धा जलदगतीने सुरु आहे. या उपकेंद्रातून २२० केव्ही चित्तेगांव, २२० केव्ही शेंद्रा, २२० केव्ही प्रस्तावित नागेवाडी (जालना-२) तसेच २२० केव्ही सेलू उपकेंद्रास वीजपुरवठा होणार आहे. या प्रकल्पामुळे वीजेचे मजबूत जाळे (ग्रीड) तयार होईल व औद्योगिक ग्राहकांच्या तसेच सामान्य जनतेच्या वीज मागणीनुसार विनाव्यत्यय, सुरळीत दाबाने वीजपुरवठा होण्यास मदत होणार आहे.

वरील कामाची तपशीलवार माहिती अउदा बांधकाम विभाग औरंगाबादचे कार्यकारी अभियंता श्री.संजय वाघ यांनी विषद केली.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांसोबत संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे, संचालक (प्रकल्प) श्री. ओमप्रकाश एम्पाल, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. रोहिदास म्हस्के, चाचणी व दूरसंचार मंडल औरंगाबादचे अधीक्षक अभियंता श्री.शशांक जावळीकर, स्थापत्य मंडल औरंगाबादचे प्रभारी अधीक्षक अभियंता श्री.प्रदीप लाखकर, अउदा बांधकाम मंडल औरंगाबादचे अधीक्षक अभियंता श्री.अरुण वाघमारे, अउदा संचलन व सुव्यवस्था विभाग औरंगाबादचे कार्यकारी अभियंता श्री. मिलिंद बनसोडे, अउदा बांधकाम विभाग औरंगाबादचे कार्यकारी अभियंता श्री. संजय वाघ तसेच ज्योती कन्स्ट्रक्शन कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.



## राज्यस्तरीय रिवॉर्ड स्कीम २०११-१२ चे विजेते जाहीर



राज्यस्तरीय रिवॉर्ड स्कीमचे विजेते जाहीर करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह, सोबत संचालक (प्रकल्प) श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (वित्त) श्री. प्रताप मोहिते व कार्यकारी संचालक (संचलन/मासं) श्री.सुभाष केळकर

| राज्यस्तरीय रिवॉर्ड स्कीमचे विजेते | | | |
|---|---|---|---|
| संचालन व सुव्यवस्थापन | | | |
| अ.क्र. | प्रवर्ग | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक |
| १. | ४०० केव्ही उपकेंद्र | वाळुज, औरंगाबाद | कराड, कराड |
| २. | २२० केव्ही उपकेंद्र | बडनेरा, अमरावती | नेरूळ, वाशी |
| ३. | १३२ केव्ही / ११० केव्ही उपकेंद्र | नळदुर्ग, औरंगाबाद | जयसिंगपूर, कराड |
| ४. | चाचणी विभाग | पुणे, पुणे | कोल्हापूर, कराड |
| ५. | वाहिनी देखभाल विभाग | एचव्हीडीसी चंद्रपूर, नागपूर | पडघे, वाशी |
| ६. | हॉट लाईन मेंटेनन्स युनिट | परळी, औरंगाबाद | अकोला, अमरावती |
| ७. | मेजर स्टोअर | वर्धा, नागपूर | कराड, कराड |
| प्रकल्प | | | |
| अ.क्र. | प्रवर्ग | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक |
| १. | बांधकाम मंडल | पुणे, पुणे | औरंगाबाद, औरंगाबाद |
| २. | बांधकाम विभाग | लातूर, औरंगाबाद | पुणे-I, पुणे |

## बंगलोर इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांची १३२ केव्ही जीआयएस पुणे उपकेंद्रास भेट



बंगलोर इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री.मणिवण्णम यांनी नुकतीच पुणे येथील महापारेषण व महावितरण कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.प्रभाकर देवरे यांनी त्यांचे स्वागत करून १३२ केव्ही जीआयएस पुणे उपकेंद्राची व परिमंडलांतर्गत विविध प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. श्री.मणिवण्णम यांनी पुणे परिमंडलांतर्गत विविध प्रकल्पांच्या कामाच्या प्रगतीबाबत तसेच महापारेषण कंपनीचे महावितरण कंपनीशी असलेल्या समन्वयाबाबत कौतुक व समाधान व्यक्त केले. महावितरण कंपनीचे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.सिद्धार्थ नागटिळक यांनीसुद्धा श्री.मणिवण्णम यांचे स्वागत करून महावितरण कंपनीच्या कामकाजाची माहिती दिली.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री.मनोहर भगत, श्री.अनिल कोलप, श्री.आर.एल. गायकवाड, महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री.दिलीप पडळकर, कार्यकारी अभियंता श्री.दत्तात्रय कोळी, श्री.राजीव देव तसेच १३२ केव्ही जीआयएस पुणे उपकेंद्राचे प्रभारी श्री.बाबुराव सिंगनाथ व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## अमरावती परिमंडलात आढावा बैठक संपन्न





अमरावती परिमंडल कार्यालयात दिनांक २८ फेब्रुवारी २०१३ रोजी संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत मुख्य अभियंता श्री. ए.एम. कावळे यांनी अमरावती परिमंडलाची इन्व्हेन्टरी, थर्मोस्कॅनिंग, मंकी पेट्रोलिंग व इतर प्रकल्पाबाबतची विस्तृत माहिती सादर केली. तसेच सांघिक कार्यालयाने अमरावती परिमंडलास वेळोवेळी दिलेली उद्दिष्टे साध्य केल्याचे निदर्शनास आणून दिले.

श्री. उत्तम झाल्टे यांनी मार्गदर्शन करताना थर्मोस्कॅनिंग, मंकी पेट्रोलिंग व इतर देखभालीच्या कामांचे महत्त्व सांगून सदर कामे नियमितपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच सदर देखभालीचे काम नियमित केल्यामुळे कंपनीची प्रणाली उपलब्धता वाढली असल्याचे सांगितले.

श्री. उत्तम झाल्टे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्युत अभियांत्रिकीमध्ये होत असलेल्या बदलांबाबत उपस्थितांना विस्तृत माहिती दिली. तसेच विद्युत क्षेत्रातील विविध घडामोडींबाबत स्वतःला अद्ययावत ठेवण्याचे आवाहन केले. महापारेषण कंपनीच्या यशाच्या चढत्या आलेखाबद्दल माहिती देऊन सर्व कर्मचाऱ्यांनी त्यात सातत्य राखण्यासाठी मनापासून प्रयत्न करावा अशी अपेक्षासुद्धा व्यक्त केली. अमरावती परिमंडलाने दिलेली उद्दिष्टे साध्य केल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले. या बैठकीसाठी सर्व अधीक्षक अभियंते श्री.गजभिये, श्री.खाडे, श्री.वानखडे तसेच सर्व कार्यकारी अभियंते व उपकार्यकारी अभियंते उपस्थित होते.

बैठक यशस्वी करण्यासाठी कार्यकारी अभियंता श्री.सुनिल शेरेकर, व उपकार्यकारी अभियंता श्री.दिनेश धुमाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अमरावती परिमंडलांतर्गत १३२ केव्ही घाटंजी उपकेंद्र व १३२ केव्ही लिलो वाहिनी कार्यान्वित





अउदा बांधकाम मंडळ, अमरावती अंतर्गत १३२ केव्ही घाटंजी उपकेंद्र व १३२ केव्ही लिलो वाहिनी दिनांक १२.१२.२०१२ रोजी संचालक (प्रकल्प) श्री.ओमप्रकाश एम्पाल, यांच्या शुभहस्ते कार्यान्वित करण्यात आली. सदर उपकेंद्र व वाहिनी कार्यान्वित करण्यासाठी मुख्य अभियंता श्री.ए.एम. कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.डी.के. रोकडे, अधीक्षक अभियंता, अउदा बांधकाम मंडल, अमरावती, श्री.वा.व. खाडे, अधीक्षक अभियंता अउदा स्थापत्य मंडल, अमरावती श्री.पी.बी. अवघड, कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम विभाग अमरावती, श्री.आर.बी. देशमुख, कार्यकारी अभियंता (स्थापत्य), अउदा स्थापत्य विभाग, अमरावती श्री.ए.एस. बागडे, उपकार्यकारी अभियंता, वाहिनी बांधकाम उपविभाग-१ यवतमाळ व श्री.एस.के. माहूरे, सहायक अभियंता, वाहिनी बांधकाम उपविभाग-१ यवतमाळ यांनी वाहिनी बांधकामाचे काम पाहिले व उपकेंद्र बांधकामासाठी श्री.एम.के. देशमुख, उपकार्यकारी अभियंता, यवतमाळ यांनी परिश्रम घेतले.

चाचणी विभागातर्फे श्री.पी.एम. देशपांडे, कार्यकारी अभियंता व त्यांचे सहकारी यांचे चांचणी व कार्यान्वयन करण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले. तसेच अमरावती विद्युत निरीक्षण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री.दिनेश खोंडे यांनी विद्युत वाहिनी व उपकेंद्राचे निरीक्षण करून, संच जोडणी कार्यान्वित करण्याची परवानगी दिली.

या शुभ प्रसंगी श्री.वाय.जी. गजभिये, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, अमरावती, श्री.ए.डी. वानखडे अधिक्षक अभियंता, चांचणी व दूरसंचार मंडल, अकोला, श्री.ए.एम. सावदे कार्यकारी अभियंता, दूरसंचार विभाग, अमरावती यांची उपस्थिती लाभली.

१३२ के.व्ही. घाटंजी उपकेंद्र कार्यान्वित झाल्यामुळे या परिसरातील सर्व वीज ग्राहकांना योग्य दाबाचा व अखंडित वीज पुरवठा मिळेल. तसेच आसपासच्या औद्योगिक व कृषी क्षेत्राची वीजेची वाढीव मागणी अखंडीतपणे पुरवणे शक्य होणार आहे.

## यवतमाळ - पांढरकवडा पारेषण वाहिनी कार्यान्वित

अउदा बांधकाम मंडल, अमरावती अंतर्गत १३२ के.व्ही. पांढरकवडा उपकेंद्र ते १३२ केव्ही यवतमाळ उपकेंद्र ही सुमारे ६५ किमीची पारेषण वाहिनी अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.ए.एम. कावळे यांच्या शुभहस्ते नुकतीच कार्यान्वित करण्यात आली. १३२ के.व्ही. पांढरकवडा उपकेंद्र कार्यान्वित झाल्यामुळे परिसरातील सर्व वीज ग्राहकांना योग्य दाबाने व अखंडित वीज मिळेल. तसेच आसपासच्या औद्योगिक व कृषी क्षेत्राची वीजेची वाढीव मागणी अखंडीतपणे पुरवणे शक्य होणार आहे.

सदर उपकेंद्र व वाहिनी कार्यान्वित करण्यासाठी श्री.डी.के. रोकडे, अधीक्षक अभियंता, अउदा बांधकाम मंडल, अमरावती व श्री. वा.व. खाडे, अधीक्षक अभियंता अउदा स्थापत्य मंडल, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.पी.बी. अवघड, कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम विभाग अमरावती, श्री.आर.बी. देशमुख कार्यकारी अभियंता (स्थापत्य), अउदा स्थापत्य विभाग अमरावती श्री.ए.एस. बागडे, उपकार्यकारी अभियंता, वाहिनी बांधकाम उपविभाग-१ यवतमाळ व श्री.एस.के. माहूरे, सहाय्यक अभियंता, वाहिनी बांधकाम उपविभाग-१ यवतमाळ यांनी तसेच उपकेंद्र उभारणीसाठी श्री.एम.के. देशमुख, उपकार्यकारी अभियंता,यवतमाळ यांनी परिश्रम घेतले.

चाचणी विभागातर्फे चाचणी व कार्यान्वयन करण्यासाठी श्री.पी.एम. देशपांडे, कार्यकारी अभियंता व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच अमरावती विद्युत निरीक्षण मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री.दिनेश खोंडे यांनी विद्युत वाहिनी व उपकेंद्राचे निरीक्षण करून, संच जोडणी कार्यान्वित करण्याची परवानगी दिली.

याप्रसंगी श्री.वाय.जी. गजभिये, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, अमरावती, श्री.ए.डी. वानखडे, अधिक्षक अभियंता, चांचणी व दूरसंचार मंडल, अकोला, श्री.ए.एम. सावदे, कार्यकारी अभियंता, दूरसंचार विभाग अमरावती व श्री देवहाते, कार्यकारी अभियंता, संवसु विभाग (महावितरण), पांढरकवडा आदी मान्यवर उपस्थित होते.

## कराड परिमंडलांतर्गत आरटीयू डीसी स्काडा कार्यशाळा संपन्न





MSLDC ऐरोली यांच्या पुढाकाराने व कराड परिमंडलाच्या सहकार्याने, चाचणी व दूरसंचरण मंडल, कराड यांनी आयोजित केलेली एकदिवसीय कार्यशाळा हॉटेल पंकज एक्झिक्युटीव्ह, कराड येथे यशस्वीरित्या संपन्न झाली. (Awareness Programme for IPP/CPP Generators & Sub Station Incharge for RTU DC SCADA & Tulip Communication of visibility of real time data to MSLDC, Airoli) सदर कार्यशाळेस IPP/CPP Generators चे २१ प्रतिनिधी, महापारेषणचे १२० अभियंते, तसेच SCADA संबंधित Service Providers चे १४ प्रतिनिधी उपस्थित होते.




या कार्यक्रमास मा. श्री.जी.टी. मुंडे, मुख्य अभियंता, कराड परिमंडल, मा.श्री.पी.एस. साळे, अधीक्षक अभियंता चाचणी व दूरसंचरण मंडल कराड यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच मा.श्री.एस.जे. पाटील, अधीक्षक अभियंता (SCADA) MSLDC यांनी परिपूर्ण माहितीचे उत्तम सादरीकरण केले आणि उपस्थितांशी संवाद साधून त्यांचे शंकानिरसन केले. M/s. Tulip चे प्रतिनिधी श्री. वॅनकुरे यांनीही Tulip Networking Devics संदर्भात सादरीकरण केले आणि तत्संबंधी शंकांचे निरसन केले. तसेच Tulip Links मध्ये येणाऱ्या Faults चे त्वरित निराकरण करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर विविध Service Providers- M/s. Stretto Enterprises, Pune; M/s. MB Controls, Thane; M/s. G.E, Pune; M/s. Signet, Pune यांनी सादरीकरण केले. सर्व IPP/CPP Generators च्या २१ प्रतिनिधींकडून त्यांचे Control-Room ceOeerue RTU-DC SCADA संबंधित सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्वरित ऐरोलीला पाठविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. या कार्यक्रमास मा.अधीक्षक अभियंता, संवसु मंडल, कराड व कोल्हापूर यांची सुद्धा उपस्थिती लाभली.

हा कार्यक्रम उत्तमरितीने संपन्न करण्यात, कराड परिमंडल कार्यालय, चाचणी व दूरसंचरण मंडल, कराड, दूरसंचरण विभाग तसेच चाचणी विभाग यामधील अभियंते व कर्मचाऱ्यांचे उस्फूर्त व महत्वपूर्ण योगदान लाभले. मा.श्री.एम.एम. गाडगीळ, कार्यकारी अभियंता, कराड परिमंडल यांनी या कार्यक्रमाचे समन्वयन केले व सौ. वर्षा शिंदे, उपकार्यकारी अभियंता, चाचणी व दूरसंचरण मंडल, कराड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.






## २२० केव्ही ब्रिजस्टोन चाकण उपकेंद्र कार्यान्वित




अउदा बां.नि.सु. परिमंडल पुणे अंतर्गत २२० केव्ही ब्रिजस्टोन चाकण उपकेंद्र नुकतेच कार्यान्वित करण्यात आले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या उपकेंद्रामुळे आंतरराष्ट्रीय ख्यातीची टायर कंपनी ब्रिजस्टोन तसेच चाकण परिसरातील इतर अनेक औद्योगिक कंपन्यांना अखंड व विनाव्यत्यय वीजपुरवठा होण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प); पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.पी.आर. देवरे, अधीक्षक अभियंता श्री.मनोहर भगत, श्री.आर.एल. गायकवाड, श्रीमती विजया मुखेडकर, तसेच कार्यकारी अभियंता श्री.सतीश गायकवाड तसेच महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री.सिद्धार्थ नागटिळक उपस्थित होते.

## अभिकल्प व आरेखनसाठी (Design & Drawings) शुल्क आकारणी

स्वतंत्र ऊर्जा निर्मिती (IPP) प्रकल्प, स्वयंपयोगी ऊर्जा निर्मिती प्रकल्प (Captive Power Plants), व इतर प्रकल्प विकासकांतर्फे त्यांच्या प्रकल्पातील वीज निष्कासनासाठी अति उच्च दाब वाहिन्या व उपकेंद्राची कामे केली जातात.

यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या मनोऱ्यांची (Towers) व उपकरणांच्या ढाच्यांची (Equipment Support Structures) प्रमाणबद्ध अभिकल्प व आराखने (Standard Design & Drawings) महापारेषण कंपनीकडे (Project & Design) उपलब्ध आहेत. तसेच प्रकल्प व अभिकल्प विभागाकडे उपलब्ध नसलेली विशिष्ट प्रकारची आरेखने अभिकल्प व अभियांत्रिकी - वाहिन्या कक्षामार्फत तयार करून दिली जातात. परंतु आता यासाठी संबंधित विकासकाकडून ठराविक रकमेची आकारणी करण्यात येत आहे.

या आशयाच्या प्रस्तावास मा.श्री.अरविंद सिंह, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मा.श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प) यांच्याशी सल्लामसलत करून नुकतीच मंजूरी दिली. त्याप्रमाणे २०१२-१३ या आर्थिक वर्षात मे. पायोनियर, मे. ए.बी.बी., मे. इंडिया बुल्स यांच्याकडून एकूण रु. ३५.१५ लाख रूपयांची आकारणीची रक्कम महापारेषण कंपनीला मिळाली.

सदर विभागात कार्यरत असलेले श्री.होटे, प्रभारी कार्यकारी अभियंता, सौ. धर्माधिकारी, सौ.बनकर, श्री.शिर्के, श्री.गायकवाड, सहाय्यक अभियंते व श्री.हेरेकर, आरेखक यांच्या सांघिक प्रयत्नातून हे शक्य झाले. याबद्दल श्री.आर.डी.चव्हाण, प्रभारी कार्यकारी संचालक (प्रकल्प) व श्री.एस.एन. कादरी, अधीक्षक अभियंता यांनी याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

## कराड परिमंडलात रिवॉर्ड स्कीम अंतर्गत बक्षीस वितरण समारंभ संपन्न




सन २०११-२०१२ या वर्षाकरिता कराड परिमंडल अंतर्गत पारितोषिक योजने (रिवार्ड स्कीम) अंतर्गत अउदा संवसु सांगली विभागातील पुढील उपकेंद्रे व उप-विभाग यांना पारितोषिक मिळाले.

१. प्रथम पारितोषिक - लाईन मेन्टेनन्स उप-विभाग, विश्रामबाग
२. प्रथम पारितोषिक -२२० के.व्ही. उपकेंद्र, मिरज
३. द्वितीय पारितोषिक -२२० के.व्ही. उपकेंद्र, विटा

दि. २५.१२.२०१२ रोजी अउदा सांगली विभागामध्ये मा.श्री.ग.तु.मुंडे साहेब, मुख्य अभियंता, परिमंडल, कराड यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त सर्व कर्मचाऱ्यांना बक्षीस वितरण समारंभ पार पडला, यावेळी मा.मुंडे साहेबांनी प्रत्येक कर्मचाऱ्याचे मनोगत ऐकुण घेतले तसेच त्यांच्याशी त्यांच्या कामाबाबत संवाद साधला व समाधान व्यक्त केले. राज्यामध्ये प्रथम येण्याकरिता काय करावे लागेल याचे मार्गदर्शन केले. श्री.सी.एल. कोळी, कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, सांगली यांनी विभागीय कार्यालयाचा आढावा घेतला व राज्य स्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवण्याबाबत आश्वासन दिले.

सदर कार्यक्रमास श्री.अशोक ढापरे, कार्यकारी अभियंता, टेस्टींग विभाग, कराड व श्री.मोहन भिसे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, सांगली व विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता सेवानिवृत्त



अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.अ.म. कावळे २८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सत्कार करताना संचालक (संचलन) श्री.उत्तम झाल्टे.

## जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात महिलांसाठी चार दिवसीय प्रशिक्षण संपन्न




पुणे परिमंडलांतर्गत जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात महिला सबलीकरण, क्षमताविकास (Women Empowerment & Capacity Development) विषयावर फेब्रुवारी महिन्यात चार दिवसांचे प्रशिक्षण संपन्न झाले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी श्री.पी.आर. देवरे, मुख्य अभियंता पुणे परिमंडल, यांच्या हस्ते सहभागी महिला कर्मचाऱ्यांना प्रशस्तिपत्र देण्यात आली.

इंडियन स्कूल ऑफ इंटिग्रेटेड लर्निंग या संस्थेतर्फे संस्थेच्या प्रशिक्षक कु.भाग्यश्री घोसाळकर व कु. सोनाली थिटे यांनी दिलेल्या चार दिवसांच्या प्रशिक्षणाचा महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या रोजच्या प्रकल्पीय कामात व वैयक्तिक विकासासाठी खूप उपयोग होणार आहे.

सदर प्रशिक्षणासाठी जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता श्री.शशिकांत बाकरे यांनी सर्व प्रशिक्षणार्थींची उत्तम व्यवस्था केली.

श्री. राहूल सुतार, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) यांनी प्रशिक्षणाचे संचालन केले.

## पुणे परिमंडलात शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पाल्यांचा रोख पारितोषिक देऊन गौरव



मार्च २०१२ मध्ये झालेल्या माध्यमिक शालान्त परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या पुणे परिमंडलातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पाल्यांचा कर्मचारी कल्याण निधीचा रोख पारितोषिक / शिष्यवृत्ती धनादेश देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री.पी.आर.देवरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भारतीय राज्यघटना संक्षिप्त पुस्तिका देऊन गौरवण्यात आले. सदर कार्यक्रमास परिमंडलाचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन श्री.रमेश कांबळे, उपव्यवस्थापक (मासं) यांनी केले. श्री.सतिश काळे, उपव्यवस्थापक (मासं) यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## २२० केव्ही भोसरी-२ उपकेंद्र, पुणे येथे ५० एमव्हीए रोहित्र संच कार्यान्वित



२२० के.व्ही. भोसरी-२ उपकेंद्र पुणे येथे श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (प्रकल्प) यांचे हस्ते ५० एमव्हीए रोहित्र संच नुकताच कार्यान्वित करण्यात आला.

याप्रसंगी मुख्य अभियंता श्री.पी.आर. देवरे, महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री.सिद्धार्थ नागटिळक, अधीक्षक अभियंते श्री.अनिल कोलप, श्री.मनोहर भगत, श्रीमती विजया मुखेडकर, श्री.दत्तात्रय कोळी- (पुणे ग्रामीण मंडल) तसेच कार्यकारी अभियंते सौ. चारूलता बेंद्रे, श्री.प्रकाश कुरसंगे, श्री.सतीश गायकवाड, श्री.अशोक कांबळे व इतर अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

## जेजुरी प्रशिक्षण केंद्रात ''शिस्त, वर्तणूक व अपील'' विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न




दि. ०८.०१.२०१३ रोजी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र जेजुरी येथे आयोजित केलेल्या प्रशिक्षणात ''शिस्त, वर्तणूक व अपील'' या विषयावर महावितरण कंपनीतून मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) या पदावरून सेवानिवृत्त झालेले श्री.एस.वाय. पाटील यांनी अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे अंतर्गत अधिकारी व कर्मचारी वर्गास एक दिवसीय प्रशिक्षण दिले. सेवाविनियमातील ''शिस्त, वर्तणूक व अपील'' या अनुसूचितील व्याप्ती व त्याचे विश्लेषण व प्रशिक्षणार्थिंनी उपस्थित कलेल्या विविध शंकांचे श्री.एस.वाय. पाटील यांनी सोप्या शब्दात निरसन केले व मौलिक मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. श्री.राहुल सुतार यांनी श्री.एस.वाय. पाटील, यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जेजुरी प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी का.अ. श्री.नागरगोजे यांनी जेजुरी प्रशिक्षण केंद्राची विस्तृत माहिती दिली.

सदर प्रशिक्षणास श्री.अनिल कोलप, श्री.आर.एल. गायकवाड- अधिक्षक अभियंते, सौ.सी.एन. बेंद्रे, श्री.पी.एस. कुरसंगे, ए.बी. कांबळे, एन.एन. कुलकर्णी, डी.डी. मदणे, पी.एन. कांबळे, पी.आर. पखाले- कार्यकारी अभियंते, श्री.गोवळकर, स.द.वसु. अधिकारी, सौ.नेवकर, श्री.धनवडे, गीडवीर, सुपे, कडलग, सौ.पी.आर. ताम्हाणे, पी.एम. अनपट- व्यवस्थापक (मासं) आणि परिमंडलाचे ईतर प्रमुख लिपीक व कर्मचारी उपस्थित होते.

श्री.रमेश कांबळे, उप.व्य.(मासं) यांनी उपस्थितांचे आभार मानले व श्री.बी.पी. आहोळ, प्रमुख लिपीक यांनी प्रशिक्षणाचे संचलन केले.

## जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात ''कार्यालयीन प्रक्रिया व संभाषण कला'' या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा




जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात आयोजित केलेल्या ''कार्यालयीन प्रक्रिया व संभाषण कला'' (Office Procedure & Communication Skill) या विषयावर श्री.सुभाष सोने यांनी अउदा बां.नि.सु. परिमंडल, पुणे अंतर्गत अधिकारी व कर्मचारी वर्गास एक दिवसाचे प्रशिक्षण दिले. प्रशिक्षणार्थींनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे श्री.सुभाष सोने यांनी निरसन केले. श्री. सुभाष सोने हे महापारेषण कंपनीतून मुख्य महाव्यवस्थापक (मासं) या पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत.

प्रशिक्षणाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. श्री.राहुल सुतार, सहा. महाव्यवस्थापक (मा.सं.) यांनी पुष्पगुच्छ देऊन श्री.सुभाष सोने यांचे स्वागत केले.

सदर प्रशिक्षणास परिमंडलाचे उपकार्यकारी अभियंते, सहाय्यक अभियंते, व्यवस्थापक /उप व्यवस्थापक (मासं) व (वि. व ले.), प्रमुख लिपीक व इतर कर्मचारी उपस्थित होते. जेजुरी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राचे सहाय्यक श्री.तुळशीराम भिमाळे यांनी उपस्थितांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली. श्री.सतिश काळे, उप व्यवस्थापक (मासं) यांनी उपस्थितांचे आभार मानले व श्री.बी.पी. ओहोळ, प्रमुख लिपीक यांनी प्रशिक्षणाचे संचलन केले.

## सूचना

**महापारेषण समाचारसाठी फोटो पाठवताना कृपया हार्ड कॉपी न पाठवता सॉफ्ट कॉपी**

**prohr@mahatransco.in**

**या ई-मेलवर मेल करावी.**

## २२० केव्ही कराड - पोफळी वाहिनीवर १.४ किमी लिलो वाहिनी व २२० केव्ही पळशी (नेर्ले) उपकेंद्राचे काम यशस्वीरित्या पूर्ण





कराड परिमंडलांतर्गत येत असलेल्या मे. पनामा विंड एनर्जी प्रा. लिमिटेड यांचे १००.८ मेगावॅट सहवीज निर्मिती प्रकल्पातील वीजेचे निष्कासन करण्यासाठी २२० केव्ही कराड-पोफळी वाहिनीवर १.४ किमी लिलो वाहिनी व २२० केव्ही पळशी (नेर्ले) उपकेंद्र उभे करण्याचे काम अउदा बांधकाम विभाग सांगली यांना सोपविण्यात आले होते. सदरचे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यात आले.

सदर वाहिनी व उपकेंद्र कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.जी.टी. मुंडे यांचे शुभहस्ते दि. ०७.०२.२०१३ रोजी यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी अधीक्षक अभियंता श्री.एस.एम. चिंचवाडकर, सौ. एस.एस. कुंभार, कार्यकारी अभियंता श्री.ए.डी. रुपटक्के, श्री.ए.के. ढापरे, उपकार्यकारी अभियंता श्री.व्ही.ए. निकम, श्री.एस.टी. जाधव, श्री.आय.वाय. कुंभार तसेच मे.पनामा विंड एनर्जी कंपनीचे श्री.कृष्णा कोनेरी आणि सदर प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेणाऱ्या मे.स्पार्क ग्रीन एनर्जी लि. चे श्री.सुधीर वाघ व श्री. दिगंबर पवार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र मागासवर्गीय विद्युत संघटनेचे द्विवार्षिक अधिवेशन संपन्न



महाराष्ट्र मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे १७वे राज्यव्यापी द्विवार्षिक अधिवेशन दि. ०९-१० फेब्रुवारी २०१३ रोजी नाशिक येथे संपन्न झाले. अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे रोजगार हमी योजना व जलसंधारण मंत्री ना.डॉ.नितीन राऊत यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास तीनही कंपन्यांच्या संचालक मंडळासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दि. १२-१३ फेब्रुवारी १९३८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनमाड येथे संपन्न झालेल्या दलित वर्गीय रेल्वे कामगार परिषदेमध्ये भारतीय कामगार चळवळीचा जाहीरनामा घोषित केला. या ऐतिहासिक घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाली. तसेच ९ फेब्रुवारी हा भारतीय कामगार चळवळीचे जनक रा.ब.नारायण मेघाजी लोखंडे यांचा स्मृतिदिन. या ऐतिहासिक घटनांचे महत्त्व लक्षात घेऊन फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची ट्रेड युनियन चळवळ संपूर्ण देशात अधिक सक्षम करण्याच्या दृष्टिकोणातून हे द्विवार्षिक अधिवेशन दिशादर्शक ठरले.

द्विवार्षिक अधिवेशना निमित्त आयोजित केलेल्या चर्चासत्रात [illegible] कर्मचाऱ्यांसमोरील आव्हाने, संविधान आरक्षण व न्यायपालिका, असंघटित कामगारांचे प्रश्न आदि महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मा.संजय घोडके यांनी भूषविले. तसेच स्वतंत्र मजदूर युनियनचे सरचिटणीस श्री.जे.एस.पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मा.आमदार वसंत गीते, मा.आमदार जयंतराव जाधव, मा. उत्तमराव खोब्रागडे, निवृत्त अध्यक्ष बहुजन कर्मचारी महासंघ यांची उपस्थिती होती.

## सांघिक कार्यालयात महापरिनिर्वाणदिन साजरा







सांघिक कार्यालयात दि. ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाणदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. उत्तम झाल्टे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी थोडक्यात आपले विचार मांडले. डॉ. आंबेडकर यांचे चरित्र हे प्रेरक असून आपण सर्वांनी त्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे तसेच आपण घटनेचा अभ्यास केला पाहिजे असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. माधव पेन्दोर, मुख्य अभियंता (मासं) श्री. बी.टी. राऊत, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील यांचीही भाषणे झाली.

श्री. महेंद्र वाकळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याप्रसंगी सांघिक कार्यालयातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते तसेच इतर अभियंते, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मूकनायक

मूकनायक बनूनी तू
एकवटलास प्राकृत भारत
महाभारतात खितपतलेला
जागविलास बहिष्कृत भारत

मूठभर होते समजत
या देशास खिरापत
गावकुसाबाहेरील तांडे, पालं
होते डांबले गुलामीत
गुलामीच्या चौकटी तोडून तू
बहरविलास जागृत भारत

राजा-रंक, अमीर-गरीब
नर-नारीत भेदाभेदी
देशाचा वटवृक्षच जाणे
अस्पृश्य आपुली फांदी
न्याय, समता रूजवून तू
घडविलास विस्तृत भारत

घेऊन युगांकित शोकांतिका
युगापार ठेवलीस दृष्टी
ज्ञानसूर्य बनून न ढळता
उजळविलीस अंध सृष्टी
ज्ञानतेजाने जगाला तू दिलास
लोकशाही अंगीकृत भारत

**- महेंद्र सदाशिव वाकळे**

**उपकार्यकारी अभियंता, सांघिक कार्यालय, मुंबई**

## सांघिक कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा





सांघिक कार्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर झालेल्या बैठकीत सन २०११-१२ साठी उत्कृष्ट उपकेंद्रांसाठी विविध गटांमध्ये बक्षीसे जाहीर करण्यात आली. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. श्रीकांत राजूरकर यांनी तसेच कार्यकारी अभियंता श्री. नांदापूरकर यांनी बक्षीसप्राप्त उपकेंद्रांबद्दल उपस्थितांना माहिती दिली. याप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. अरविंद सिंह यांनी परिमंडल तसेच मंडल स्तरावरच्या अधिकाऱ्यांनी बक्षीसप्राप्त उपकेंद्रांना भेटी देऊन तेथील कामकाजाची पाहणी करुन तेथील चांगल्या बाबींची अंमलबजावणी इतर उपकेंद्रांमध्ये करण्याविषयी सूचना दिल्या. तसेच बक्षीसप्राप्त उपकेंद्रांमधील कामकाज अधिक चांगल्या पद्धतीने कसे करता येईल याविषयी संबंधितांना सूचना दिल्या.

सदर कार्यक्रमासाठी संचालक (प्रकल्प) श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (वित्त) श्री. प्रताप मोहिते, कार्यकारी संचालक (संचलन/मासं) श्री. सुभाष केळकर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कळवा मंडल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

महापारेषणच्या वाशी परिमंडलातील अ.उ.दा. (सं. व सु.) मंडल, कळवा येथे ६४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

वाशी परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.विकास बढे साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला व राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यात आली.

६४व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शालांत परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या व शिष्यवृत्तीचे मानकरी ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश देण्यात आले.

कु.स्नेहल सुनिल सुर्यवंशी, आदित्य एस.देसाई, केतन एस. मोरे व कु. दुर्गा नामदेव राठोड यांना मा.श्री.विकास बढे, मुख्य अभियंता यांच्या शुभहस्ते शिष्यवृत्तीचे धनादेश देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

तसेच कळवा संकुलातील सुरक्षा अधिकारी व सुरक्षा पर्यवेक्षक यांनी २२० केव्ही यार्डात लागलेली आग आटोक्यात आणण्या करीता केलेल्या लक्षणीय कामगिरीबद्दल त्यांचा पुष्पगुच्छा देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी सुरक्षेचा प्रश्न अतिशय महत्वाचा असून अशाच प्रकारची कामगिरी अपेक्षीत असल्याचे मत मा.श्री.विकास बढे, मुख्य अभियंता यांनी व्यक्त केले.

प्रजासत्ताक दिना निमित्त कर्मचाऱ्यांना उत्साह वाढविण्यासाठी क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले. सकाळी १०.०० वाजता क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन मा.श्री.विकास बढे, मुख्य अभियंता यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री.गहेरवार, श्री.कसबेकर तसेच कार्यकारी अभियंता श्री.सुर्यवंशी, श्री.देसाई, व्यवस्थापक श्री.शिवाजी पाटील व इतर अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थिती नोंदवून खेळाडूंचा उत्साह वाढविला.

## सांघिक कार्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



शिवजयंतीनिमित्त सांघिक कार्यालयात सजवलेली शिवप्रतिमा



शिवप्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंह

## पुणे येथे शिवजयंती उत्साहात साजरी




पुणे परिमंडल येथे प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव संयुक्त कर्मचारी संघटना उत्सव समितीतर्फे उत्साहात साजरा करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे व वक्ते श्री. श्रीमंत कोकाटे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर व्याख्यान झाले. याप्रसंगी महापारेषण व महावितरण या दोन्ही कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. अधीक्षक अभियंता श्री.अनिल कोलप तसेच महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता श्री.पडळकर यांनीही याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.बाबा शिंदे, महावितरण यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.पी.आर. देवरे, महावितरण कंपनीचे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री.सिद्धार्थ नागटिळक तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन श्री.किशोर अहिवळे यांनी केले. श्री.उत्तम धनवटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# Merits and Demerits of various communication systems and their applications in MSETCL.

## PLCC systems:-

It is the basic communication system for power sector. It is suitable for speech communication, protection signalling, data transmission and supervisory control.

Operating frequencies - 50-500 Khz

| Merits | Demerits |
|---|---|
| • High mechanical strength of conductor increases the reliability of transmission medium | • Prone to noise associated with power lines<br>• Limited carrier bandwidth availability |
| Integrated trunk network can be established | • Limitation on number of channels connected to same power line |
| • Best suited for power line protection. when transmitted over number of PLCC links along route, group delay distortion | • Quality of data transmission is poor |
| • Suitable for data transmission at low speeds at 50 to 600 bauds with speech or 1200 bauds without speech | • Not suitable for high speed data transmission |

**Applications:-**

- For permissive inter tripping & direct tripping of 400KV Lines, permissive tripping/blocking on 220kv & permissive inter tripping on 132kv lines.
- For speech and data transmission
- For SCADA applications.

## VHF systems:-

**Operating frequencies:** – 30 to 300 MHz

| Merits | Demerits |
|---|---|
| • Independent of power line | • Range of operation is limited to line sight |
| • Independent from DOT circuits | • Range of operation is limited in hilly countryside or heavily build up areas due to absorption by hills & buildings and vegetations |
| • Low cost | |

**Applications:-**

- Can be used for voice communication within range of 40 to 50 Kms in plains
- project sites during construction stage.

## Microwave Communication:-

**Operating frequencies:-** 300 to 1000 MHz & 2 to 11 GHz.

| Merits | Demerits |
|---|---|
| • Same as VHF system. | • This is purely line of sight system. Hence towers of suitable height are to be erected which will be difficult in hazardous hilly terrain. |
| • Multichannel operation is possible. | • High gain parabolic antennas are to be used. |
| • High degree of reliability. | • Repeaters are to be used at least 50 kms. apart which would necessitate buildings, power supply, installation of equipments and other infrastructure at these intermediatory stations. |

**Applications:-**

- For high speed data transmission & communication between ALDC to SLDC

## Satellite communication:-

**Limitations:**

- Propagation delay of 2sec per uplink & downlink makes satellite communication unsuitable for EHV line protection and for SCADA applications in real time environment.
- Entire communication channel get affected during eclipse of the satellite.

**Applications:-**

- Can provide speech & data channel link between SLDC & ALDC.
- Can be used as voice link to the remote generating stations from LD Centre.
- Can provide V-Sat communication in case of disaster management.

## Fibre Optic Communication

**Features:-**

- Independent of noise and electromagnetic disturbances, low error rate, can withstand harsh electrical environment, more secure transmission medium
- Fiber optic cable can be embedded into EHV Line ground wire,

**Merits:-**

- Large bandwidth, large transmission capacity, employs digital transmission, large repeater spacing, electrically non conductive medium, negligible cross talk, high degree of data security, no radiation, no frequency clearance is required, lower cost per channel, wavelength multiplexing are some of the salient features of fiber optic communication.
- The fiber optic communications is thus more advantageous over the other systems of communication.

**Demerits:-**

- Repeater stations are to be provided in case of long distance communication link.

**Applications:-**

All the communication requirement of power utility such as speech communication, real time data transmission to ALDC/SLDC, SCADA applications, compatibility with LAN/WAN Ethernet, VOIP, Network management, EHV line protection can be fulfilled by fiber optic communication system effectively.

## भेट द्यावी असे उपकेंद्र - वाशाळा

१५ ऑगस्टला झेंडावंदन झाल्यानंतर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसहित २२० केव्ही वाशाळा उपकेंद्राला भेट देण्याचा योग आला. कल्याणपासून साधारणपणे ८०-९० कि.मी. अंतरावर नाशिक, अहमदनगर जिल्हयाच्या सीमेलगत असणाऱ्या डोंगराळ भागात २२० केव्ही वाशाळा उपकेंद्र आहे. नागमोडा, नदया-नाल्यांचा रस्ता पार करत आम्ही तेथे पाहोचलो. रस्त्यावर तुरळक वाहूतक होती. फक्त बस तेवढया जास्त दिसत होत्या. वाशाळा उपकेंद्र कसे असेल याचा विचार करतच आम्ही तिथे पोहोचलो. आपण दुर्गम भागात जात आहोत असा विचार प्रवास सुरु करताना आमच्या मनात होता. पण प्रवासात मनात चाललेले विचार कसे चुकीचे होते, त्याचा प्रत्यय तिथे पोहोचल्यावर आला.

उपकेंद्राच्या भोवतालच्या भिंतीवर उपकेंद्राचे नाव, इतर माहिती सविस्तरपणे लिहिलेली होती. प्रवेशद्वाराजवळ असणाऱ्या गेस्ट रुमला 'अनुभूती' असे नाव. आतील पायऱ्या स्वच्छ. सर्व छान रंगवलेल्या. टाकीत पाणी कधी भरले, पाण्याची टाकी कधी साफ केली यांच्याही तारखा अद्ययावत होत्या.

आत पॅसेजमध्ये सुरक्षितता, अपघात यावर कर्मचाऱ्यांनी स्वत: पोस्टर काढलेले होते. नोटीस बोर्डवर कर्मचाऱ्यांच्या फायद्याच्या योजना, सर्क्युलर व्यवस्थित लावले होते.

वाशाळा उपकेंद्रातील कर्मचाऱ्याने आम्हाला उपकेंद्र दाखविले. सर्व उपकरणांना पेंट जणू आत्ताच केलाय अशी ती उपकरणे वाटत होती. त्या सर्वांवर त्यांची नावे, शिवाय एसएपी क्रमांक लिहिलेला होता. हे उपकेंद्र बघताना एखादी उत्तम शाळा आपण बघत आहोत असेच मला वाटत होते.

उपकेंद्रातील भिंतीलगत असणाऱ्या वृक्षांवरदेखील त्यांची नावे व वृक्ष क्रमांक लिहिलेला होता. इच्छा असली की काम कसं उत्तमरित्या होऊ शकतं याचं वाशाळा उपकेंद्र हे उदाहरण ठरावं. मी माझ्या सहकाऱ्यांना तसं बोलूनही दाखवलं.

चांगली गोष्ट कुठे बघितली, ऐकली की त्याची अंमलबजावणी त्वरीत, करणे हेच या उपकेंद्रातील रहस्य असल्याचे उपकेंद्रातील उपकार्यकारी अभियंता श्री.श्रीकांत पेटकर यांनी सांगितले.

वाशी परिमंडलातून प्रथम आलेल्या १०० केव्ही शहापूर उपकेंद्र व लाईन उपविभाग डोंबिवली यांचा वाशाळा येथे सत्कार करण्यात आला. 'आठवण' नावाचे सन्मानचिन्ह त्यांना देण्यात आले. एखादी सत्यनारायणाची पूजा आयोजित करून, भोजन ठेवून कार्यक्रम करण्यापेक्षा स्वातंत्र्यदिन साजरा करून इतर गुणीजनांचा सत्कार ठेवण्याचा वाशाळावासियांचा प्रयत्न कौतुक करण्यासारखा आहे.

स्वातंत्र्यदिनी वाशाळासारख्या एका चांगल्या उपकेंद्राला भेट द्यायला मिळाली याचा मनोमन आनंद वाटत होता.

काम एके काम करणाऱ्या सर्वसाधारण कर्मचाऱ्यांनी काम सांभाळूनच उत्तमरित्या कार्यालय, लाईन सांभाळणाऱ्या वाशाळा उपकेंद्राला तुम्हीही एकदा भेट द्यावी एवढंच सांगावसं वाटतं.

**- सुहास रोकडे,**

**प्रभारी उपव्यवस्थापक (मासं), डोंबिवली**

## क्षण निवृत्तीचा येता...

कसा असेल तो दिवस? माझ्या दृष्टीने सर्व काही थांबलेलं! रोजची धावपळ, धडपड, ऑफिसला जायचे म्हणून सकाळपासून करावा लागणारा स्वयंपाक, कामाची आवराअवर ही सगळी गडबड असणारंच नाही. एक दिवस ऑफिस कायमचे बंद ही कल्पना मला आत्ता तरी करवत नाही.

मी हया ऑफीसच्या कामातून निवृत्त होणार. रोज भेटणारे कार्यालयीन सहकारी/अधिकारी मैत्रिणी कोणीही भेटणार नाहीत. अहो घरच्यापेक्षा जास्त काळ आपण ऑफीसमध्ये व्यतीत करतो. त्यामुळे एखाद्या कुटुंबातील माणसे असावीत तसे आम्ही सर्वजण एकमेकांबरोबर वावरतो. एकमेकांच्या सुखदु:खात सामील होतो. प्रसंगी एकमेकांना मदत करतो. म्हणूनच मला हया सर्व गोतावळयास सोडून जाताना फारच वाईट वाटते. एमएसईबी ते महाट्रान्स्को कंपनी ही ३७ वर्षांची वाटचाल! मागे वळून पाहताना असे वाटते की सहज निघून गेली आहेत. कारण कार्यालयीन कामाच्या चढउतारात येथील अधिकारी/कर्मचारी सहकाऱ्यांनी दिलेला मदतीचा हात, साथसंगत, जिव्हाळा हयाच्यामुळे इथपर्यंतचा टप्पा यशस्वीपणे पार पाडू शकले.

आमच्या हया संस्थेने आम्हाला भरभरून दिले. पूर्वीच्या कडक शिस्तीच्या अधिकाऱ्यांकडून आम्ही शिस्त शिकलो. कामे समजून उमजून केली. हया संस्थेच्या जीवावर आम्ही घरेदारे घेतली, आमची मुलंबाळं शिकली. एखाद्या आईसारखा तिने आमचा सांभाळ केला. म्हणूनच निवृत्त होऊन जाताना मन भरून येते. पण आठवणींची शिदोरी बरोबर असल्यामुळे येथील आठवणी आयुष्यभर साथ-संगत करणार आहे.

प्रत्येक कर्मचारी/अधिकारी यांना एक ना एक दिवस निवृत्त व्हावेच लागते. ऑफीसच्या दृष्टीने तो केवळ एक सोपस्कार असतो. परंतु निवृत्त व्यक्तीच्या जीवनातील ते एक स्थित्यंतर असते. तो आयुष्यातील एक टर्निंग पॉईंट आहे. पुढे जाऊन काय करणार हे ठरवलेलं नाही. परंतु मार्गात येणाऱ्या-जाणाऱ्या गरजू व्यक्तींना मदत करायची एवढं जरूर ठरवलंय. शेवटी म्हटलेच आहे ''ईश्वरेच्छा बलीयसी''. त्याप्रमाणे परमेश्वरावर भरवसा ठेवून पुढील मार्गक्रमण करीन.

जाता जाता माझ्या सहकारी मित्र/मैत्रिणींना एवढंच सांगू इच्छिते की वेळेला महत्व द्या व प्रत्येक कामकाज समजून-उमजून करा. आपण कायम विद्यार्थीच असले पाहिजे. कारण म्हटलेच आहे. ''ख्द्दैतु ग ब्द्लि ज्दै'' तुमच्या ज्ञानाचा इतरांना उपयोग होऊ दे. तरंच आपली संस्था मोठी होईल प्रत्येक गोष्ट पैशानेच मोजता येत नाही. गीतेतील वचन सांगते की, ''कर्मण्ये वाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन'' फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करीत रहा. परमेश्वर तुम्हाला सर्व काही देतोच असा माझा अनुभव आहे.

माझ्या या कंपनीतून सेवानिवृत्त होताना माझा ऊर भरून येतो व वाटते की ह्या संस्थेची भरभराट होताना माझ्या कार्यालीयन बंधू-भगिनींचे जीवन आमच्यासारखे सर्वांगीण फुलू दे. त्यांनाही यश मिळू दे हीच देवापाशी प्रार्थना.

**- सौ.कस्तुरी सु. सावंत**

**(वरिष्ठ व्यवस्थापक/भांदेवि मुख्य कार्यालय)**

**(३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त)**

## जबाबदार कोण ?



आपण सर्वजण दररोज सकाळी वृत्तपत्र उघडून पाहतो तेव्हा  या देशात काय काय घडामोडी घडतात ते वाचतो. वृत्तपत्रातील जास्तीत जास्त घटना या समाजाला काळिमा फासणाऱ्याच असतात. भ्रष्टाचार, दरोडे, खून, बलात्कार, सामूहिक बलात्कार, हुंडाबळी, स्त्री भ्रूणहत्या अशा सर्व घटनांनी मन सुन्न होऊन जाते. मनाला आनंद देणाऱ्या घटना खूप कमी आहेत. आणि दु:खद घटनांचे प्रमाण अवास्तव वाढलेले दिसते. आजची बातमी फक्त आजचा दिवस. उद्या दुसरी. पहिल्या बातमीचा विसर.

ज्या स्त्रीला समाजामध्ये बरोबरीचा आधारस्तंभ मानला जायला हवा, त्याच स्त्रीच्या अब्रूची लक्तरे आज वेशीवर टांगली जात आहेत.याला जबाबदार कोण ?  हे चित्र आपण बदलू शकत नाही का ?

पूर्वीपासूनच स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान आहे. मुळात ती कितीही हुशार असली तर तिची गणना मूर्खातच होत असते. ती कोणताही निर्णय स्वत: न घेता लहानपणी वडील, लग्नानंतर पती व म्हातारपणी मुलगा हया साखळीत तिला बांधून ठेवले आहे. ही समाजव्यवस्था अशी आहे की, स्त्रीला परावलंबी करून ठेवले आहे. हुंडयासाठी स्त्रियाच बळी पडतात. घरगुती अत्याचारालाही स्त्रियाच बळी पडतात. समाज स्त्रियांकडे फक्त भोग वस्तू म्हणूनच पाहत आहे.

समाजात स्त्रिला समान दर्जा राज्यघटनेने दिला आहे, पण त्याची किती अमलबजावणी होते ? निवडणुकीत निवडून आल्यावर सही बाईची आणि कारभार बाप्याचा अशी परिस्थिती आहे. यावर उपाय कोण शोधणार ? आजची स्त्री वेगवेगळ्या विद्याशाखांमध्ये शिक्षण घेते. तिला काही प्रमाणात स्वातंत्र्य मिळाले आहे पण काय उपयोग ? ती आज समाजामध्ये बिनधास्त राहू शकते का ? नाही... कारण समाजामध्ये अत्याचार करणाऱ्या हैवानांना वेसन घालणारा कायदाच कुमकवत आहे. जर स्त्रियांनी समाजामध्ये निर्भय जगायचे असेल, तर अत्याचार करणाऱ्याला कठोरात कठोर शासन झाले पाहिजे. तरच समाजातील विकृतीवर वचक बसेल.

मुलींनी फॅशन करावी पण त्याचा अतिरेक होता कामा नये याची काळजी आपणच घेतली पाहिजे. मुलांनी खोडकर असावे पण विकृत असू नये. जर अयोग्य असेल तर त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. कारण वेळीच आळा घातला नाही तर अनर्थ होऊ शकतो. आई वडील होणे सोपे आहे पण चांगले पालक होणे खूप अवघड आहे. चला तर मग, चांगली पिढी घडवण्यासाठी कटिबद्ध होऊया.

**-भारती लोकरे (कांबळे) (मुख्य लिपिक)**

**विभाग-मावक, सांघिक कार्यालय, मुंबई**

## मद्यपान एक सामाजिक समस्या

सध्या समाजात मद्यपानाचे प्रमाण प्रचंड वाढलेले दिसून येते. याला विविध कारणे आहेत. संगत, ताणतणाव, गंमत व त्यामधूनच त्याचे सवयीत रुपांतर होते व यामध्ये पैशाची व शरीराची नासाडी होते. मद्य प्यायल्याने प्रामुख्याने लिव्हरला मोठी हानी संभवते. त्याशिवाय मेंदू, मज्जासंस्था यावरदेखील घातक परिणाम शक्य आहे. मद्यप्राशनाने वाहने चालवून होणाऱ्या अपघातांचे प्रमाण प्रचंड आहे. असे असूनदेखील मद्यसेवनाचे प्रमाण व या व्यवसायाची दिवसेंदिवस वृद्धीच होत आहे.

'पीनेवालों को पीने का बहाना चाहिए' अशी स्थिती आहे हे मात्र नाकारुन चालणार नाही. एखाद्याला प्रमोशन मिळो, अपत्यांचे शैक्षणिक सुयश, घरबांधणी, लग्नाची पार्टी अशी एक ना अनेक कारणं.

मद्यप्राशनाचे दुष्परिणाम तर फारच गंभीर भासतात. उदा. आत्महत्या, खून करणे, मारामाऱ्या, वेगाने वाहन चालवून दुसऱ्याला जखमी करणे वा मृत्यूच्या दारात लोटणे. मद्यपी व्यक्ती कोणाचे म्हणणे वा उपदेश ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नसतात.

एकदा एका मद्यपीला अति मद्यपानामुळे दवाखान्यात ॲडमिट करावं लागलं. डॉक्टरांनी त्याच्या नातेवाईकांना सांगितले की याने मद्यपान सोडले तरच हा काही दिवस जगू शकेल. परंतु मद्यपी म्हणाला की मी मेलो तरी चालेल, परंतु मी पिणं सोडणार नाही.

एक गृहस्थ मद्यपान करून घरी आले. डॅडी आले, डॅडी आले म्हणून लहान मुले उडया मारत त्यांना बिलगली पण डॅडी म्हणाले, ए व्हा बाजूला, पळा तिकडं. जणू काही महाशय युद्धावरूनच घरी आले होते. तर असे हे मद्यपुराण.

मद्यपान हे व्यक्तिगत व पर्यायाने सामाजिक समस्या ठरू शकते. सेलिब्रेशनपर्यंत सगळीकडे त्याचा बोलबाला कायम असल्याची वस्तुस्थिती नाकारणार कशी ?

कोणतेही व्यसन मनुष्याला दिशाहीन, ध्येयशून्य बनवते. व्यसनाने व्यक्तीच्या आणि कुटुंबाच्या जीवनातील आनंदच हरवून जातो. कुटुंबाचे अध:पतन होते. अर्थात हा सर्वनाशाचाच मार्ग आहे. व्यसनाधिनतेमुळे शुक्राचार्यासारखा विद्वान संजीवनी विद्येला पारखा झाला. तर युधिष्ठिरासारखा धर्मनिष्ठावंत जुगारात हरल्याने पत्नीच पणाला लावून बसला. व्यसनाधीनतेमुळे मनुष्य कोणत्या थराला जातो हेच यातून स्पष्ट होते म्हणून व्यसनाला वेसण घातलीच पाहिजे.

माणसाच्या मनाला जेव्हा पटेल तेव्हाच परिवर्तन शक्य आहे. या कामी मन स्थिर करण्यासाठी किंवा चंचल मनावर काबू मिळवण्यासाठी योगाचा आधार घेऊन वाटचाल केल्यास समाजाचा देखील कायापलट होऊन 'आदर्श जग' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरेल असे वाटते.

**- श्रीपाद ना. नाटेकर**

**ईएचव्ही ओ अँड एम ड़िव्हिजन, रत्नागिरी**

## वीजेची बचत म्हणजेच वीजेची निर्मिती!



'अहो, पाहिलंत का ? केवढं बिल आलं आहे ते ?'

'केवढी युनिटस् आपण जाळलीत? तुम्हाला ना काहीच कळत नाही!.'

'काय म्हणालात? तुमची बायको वीज मंडळात कामाला आहे?

'अहो, वीज मंडळ काही आम्हाला वीजेचे बिल देत नाही!.'

'उगाचच काहीतरी बोलू नका, नाही देत तेच बरं आहे, नाहीतर सर्वांनी तुमच्यासारखीच भरपूर युनिटस् जाळली असती.'

'अगं बाई, हे काय स्वयंपाकघरातला फॅन चालूच आहे, अहो दहा मिनिटं झाली, तुम्हाला हॉलमध्ये येऊन !'

'काय म्हणालात? मी का नाही बंद केला?

'हे बरं आहे तुमचं! डाफरा माझ्यावरच आणि आता भांडणात वेळ घालवण्यापेक्षा बंद करा.'

'अहो, मी एसी लावून बेडरुममध्ये मेकअप करत होते. आज ऑफिसमध्ये कार्यक्रम आहे नां! जरा चेहऱ्यावर हात फिरवण्यासाठी स्वयंपाकघरात आले तेव्हा बघितलं तर स्वयंपाकघरातला फॅन चालूच. बंद करा तो आधी. आणि आता जरा शांत बसा. मला मेकअप करु द्या.

'स्वयंपाकघर तर तसंही मला आवडत नाही, तुम्हीच वापर करता जास्त, त्यामुळे त्याची जळलेली युनिटस् तुमच्या नावावर.'

'आपल्या माई बघा दिवसभर टीव्ही लावून बसतात, तेच तेच कार्यक्रम सतत पाहतात, ऐकू येत नाही म्हणून टीव्हीचा आवाज मोठा करतात. त्यामुळे ध्वनिप्रदूषण वाढते. टीव्ही बघताना त्यांना फॅनही सुरु असायला हवा त्यामुळे पुन्हा युनिटस् जळतात म्हणजे दिवाणखान्यातील बिल त्यांच्या नावावर!'

'अहो, किती गरम पाणी वापरतात त्या , गिझरची युनिटस् नाही का जास्त जळत ! असं मी बोलले की, लगेच आईची बाजू घेऊन म्हणता, ती म्हातारी आहे, पाय शेकायचे असतात ! माझा मेला कधी पुळका नाही.'

'मी ऑफीसला गेले की, रुमचा कब्जा तुमचा. दिवसभर टिव्हीवरच्या न्यूज पहायच्या, पंखे लावायचे आणि वीज जाळायची ! न्यूज पाहण्यापेक्षा पेपर वाचा की, पेपर तर रोज घेता नां ! मग सगळ्या बातम्या कळतातच नां ! म्हणजे पेपर काय फक्त रद्दी वाढवण्याकरता का !'

'अहो! आपल्या घरापासूनच सुरुवात करायची ना, मी वीज मंडळात काम करते, म्हणजे वीज बचत मी माझ्या घरापासूनच सुरु करायला हवी. तर चला, प्रत्येकाने ठरवूया की, वीज उपकरणे म्हणजे पंखे, टीव्ही., गिझर वगैरे जेव्हा उपयोगात नसतील तेव्हा बंद करु या व वीजबचत करण्यास मदत करु या.'

Better late than never... नाही का?

हा झाला घरातला संवाद यातूनच कळतं की, आपण दररोज किती वीज वाया घालवतो ते! परंतु बाहेरच्या जगातही काय तेच चालतं ! अहो, लग्नसमारंभात तर वीजेचा नुसता लखलखाट असतो, डेकोरेशनच्या नावाखाली भरपूर वीज जाळतात, केव्हा केव्हा तर स्ट्रीट लाईट्स सबंध दिवस चालूच असतात. केवढा हा वीजेचा अपव्यय? त्यासाठी जनजागृतीची गरज आहे.

आजच्या महागाईच्या जमान्यात आपण जिथे शक्य असेल तिथे जशी पैशांची बचत करतो, तशीच प्रत्येक घराघरातून वीजेची बचत व्हायला हवी, पुढील



पिढ्यांसाठी हे फार आवश्यक आहे.

गेल्या वर्षी मी अमेरिकेला गेले होते. तेव्हा मी दुस-या रुममध्ये जाताना लाईट बंद करायला विसरले. तेव्हा माझ्या भाचीचा पाच वर्षांचा मुलगा लगेच म्हणाला, 'आजी, लाईट बंद कर. आम्हाला शाळेत सांगितलं आहे की, गरज नसेल तेव्हा लॅम्प बंद करायचे.' त्या छोट्याला त्याचं ज्ञान होतं, पण मला त्यावेळी ते सुचलं नाही, याची लाज वाटली. लहानपणापासूनच मुलांना वीजबचतीचे धडे द्यावयास हवेत.

वीजेची बचत केली तरच सर्व देशाची प्रगती आहे. कारखाने, हॉस्पिटल्स अशा कितीतरी गोष्टी वीजेशिवाय चालूच शकत नाहीत. म्हणून म्हणते...वीजेची बचत म्हणजेच वीजेची निर्मिती!

**-अनुधारा सावंत**

**उपव्यवस्थापक, सांघिक संवाद विभाग, सांघिक कार्यालय**

## इन गॉड्स ओन कंट्री



मुलीच्या शाळेच्या दिवाळीच्या सुट्टया आणि करवीर टूर्सच्या वेळेवर मिळालेल्या बुकिंगमुळे अचानक केरळ बघण्याचा योग जुळून आला आणि निसर्गसौंदर्यात सात दिवस स्वतःला बुडवून घेण्याचा आनंद घेता आला.

सात दिवसांच्या केरळच्या दर्शनाची सुरुवात कोचीपासून झाली. कलाडी इथे कोचीपासून जवळच असलेल्या शंकराचार्यांच्या जन्मस्थानाचे दर्शन घेतले. हे जन्मस्थान व कोचीनमधील शिवमंदिर, बोटिंग, चायनीज फिशिंग नेट हे बघितलेच पण आयुष्यात कधीही विसरता न येणार नाही असे कथकली नृत्य तब्बल दोन तास बघितले. कथकली हे केरळचे प्रसिद्ध नृत्य. त्या नृत्यप्रकाराच्या तयारीपासून दुःशासन वधाची गोष्ट नृत्यातून बघणे हा अतिशय सुंदर अनुभव होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मुन्नारकडे जाण्यासाठी प्रवास सुरु केला. रस्त्याच्या दुतर्फा बागा, भरपूर झाडं. गर्द वनराईतून नागमोडी वळणं घेत जाणारा रस्ता. या रस्त्यावरुन जाताना अगदी स्वप्नवत वाटत होतं. हा प्रवास कधी संपला हे कळलंदेखील नाही. मुन्नारला चहाच्या मळ्यांमधून जाणारा रस्ता पाहताना डोळे थकत होते पण सृष्टीसौंदर्य संपत नव्हते.

चहाच्या बागांबरोबरच तिथे आम्ही मसाल्याच्या पदार्थांची बाग पाहिली आणि त्यातून मिळालेली माहिती शाळेत जाणाऱ्या आमच्या मुलींइतकीच आम्हालाही फायद्याची ठरली. त्यानंतर हत्तीवरून फिरण्याची मजा अनुभवली.

एखादी सुंदर गोष्ट असली की, नजर लागू नये असे वाटते म्हणून आपण त्याला काळा तिट लावतो. तसेच काही आमच्याबाबतीतही झाले. दुसऱ्या दिवशी पेरियारला जायचे होते पण पेरियारमध्ये राजकीय पक्षांनी बंद पुकारला त्यामुळे तिकडे जाणे रद्द केले पण त्याची पूर्ण कसर अल्लेप्पीला भरून निघाली. अल्लेप्पीला बॅकवॉटरमध्ये दोन तास बोटिंग केले. बीचवर सर्वांनी गरम गरम भजांचा आस्वाद घेतला आणि आमचा ग्रुप त्रिवेंद्रमकडे रवाना झाला. त्रिवेंद्रमचे वर्तमानपत्रातून झळकणारे पद्मनाभ मंदिर बघताना अक्षरशः भान हरपते. तिथले सौंदर्य, वास्तुकला, स्वच्छता हे सगळे बघून आम्ही सारे हरखून गेलो.

भारताचे शेवटचे टोक अर्थात कन्याकुमारी आम्ही प्रवासाच्या शेवटच्या दिवशी गाठले. तिथला संगम बघून मन प्रफुल्लित झाले. विवेकानंदांची भव्य मूर्ती बघून मनाला असीम शांतता मिळाली.

सूर्योदय आणि सूर्यास्त दोन्ही पहायला मिळाले आणि सृष्टीच्या अमाप रंगांची उधळण याच डोळ्यानी अनुभवली. आता परतीची ओढ लागली होती. परतीच्या प्रवासात केरळवर मुक्त हस्तानं केलेली सृष्टीसौंदर्याची उधळण आठवून कदाचित त्यामुळंच केरळला गॉड्स ओन कंट्री म्हणत असावेत असं वाटत होतं.

स्वच्छंद जगा रे उंच उडी द्या सुप्त गुणांना वाव
बाहयरुपाच्या अंतरगांशी नको तो लपंडाव
स्वच्छ मनाने नव्या दमाने करा जीवनारंभ
आयुष्यातील प्रत्येक दिवस असेल समारंभ

- मंजुषा दुसाने,
व्यवस्थापक (मासं), औरंगाबाद

## ...कलियुगातील सारथी जेव्हा प्रशिक्षण घेतो!



प्राचीन काळी महाभारतात जसा भगवान श्रीकृष्ण सारथी होता, तसाच मी कलियुगातील चारचाकी वाहनाचा सारथी (वाहनचालक) आहे.

काही महिन्यांपूर्वी महापारेषण कंपनीने वाहन चालकांसाठी दोन दिवसांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. कंपनीतले बरेचसे वाहनचालक हे सेवानिवृत्तीकडे झुकलेले आहेत. तेव्हा या वयात प्रशिक्षण शिबीर काय कामाचे असा कुरकुरवजा स्वर आम्हा काही लोकांचा होता, तर काहींचं म्हणणं असं होतं की देर आए दुरुस्त आए! उशीरा का होईना पण कंपनी कसलंतरी प्रशिक्षण देतेय हेही नसे थोडके!

मला वाटतं ठराविक कालावधीने अशी प्रशिक्षण शिबिरे गरजेची आहेत. अशा शिबिरांच्या आयोजनामुळे साचेबद्ध कामामध्ये थोडासा बदल होतो आणि एक वेगळा निवांतपणा मिळतो.

आजकाल चारचाकी वाहनांमध्ये नवनवीन मॉडेल आलेत. त्यातील नवनवीन तंत्रज्ञानाबद्दल आम्ही अनभिज्ञ होतो. या शिबिरात गाड्यांच्या नवनवीन मॉडेल आणि त्यातील तंत्रज्ञानाबद्दल मला माहिती मिळाल्याने मला या शिबिराचा फायदाच झाला. तसेच वरिष्ठांशी कसे वागावे, कसे बोलावे, आपले आचरण कसे असावे याचे मार्गदर्शनदेखील इथे मिळाले.

कंपनीतील वाहनचालक हे पूर्वी भरती झालेले आहेत. त्याकाळी शिक्षणाची अट ७ वी ते ८वी पास अशी असल्याने बरेच वाहनचालक जेमतेम शिकलेले आहेत. सध्या गाडयांची माहितीपुस्तिका इंग्रजी भाषेत असल्याने त्यातील माहिती आत्मसात करणे कठीण होते.

जास्तीत जास्त वाहनचालक हे फिल्डमधील आहेत त्यांना त्यांच्या कुटुंबा पासून दूर राहावे लागते. कधीतरी रविवारीसुद्धा कामावर जावे लागते. अशा परिस्थितीत त्यांच्या मनावर किंवा शरीरावर ताण आलेला असतो. तो ताण किंवा शीण कमी करण्यासाठी अशा शिबिरांचा औषधासारखा उपयोग होतो.

अशा शिबिरांचे आयोजन भविष्याच्या दृष्टीने योग्यच आहे, पण कालावधी वाढला तर बरं होईल असे मला प्रामाणिकपणे वाटते.

-सदानंद तांडेल
**वाहनचालक, शिष्टाचार विभाग, सांघिक कार्यालय, मुंबई**
**(दि. ३१ जानेवारी २०१३ रोजी निवृत्त)**

## गझल चे गारूड

सातवे अखिल भारतीय मराठी गझल सम्मेलन दि. ०९ व १० फेब्रुवारी २०१३ रोजी अष्टगाव ता. मोर्शी, जि.अमरावती येथे संपन्न झाले. अष्टगाव हे गझलनवाज पंडित भीमराव पांचाळे दादांचे जन्मगाव. याआधी भीमराव पांचाळे यांनी आयोजित केलेली मराठी गझल सम्मेलने ही मुंबई, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, वाई व गोवा (पणजी) अशा ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. मराठी गझलचा झेंडा खांद्यावर घेऊन भीमराव पांचाळे भारत तसेच विदेशात फिरत असताना त्यांना मनोमन सतत वाटत राहायचं की, माझ्या जन्मगावात हा गझलचा सोहळा कधी होणार ? माझे गझलकार, गायक, रसिक, चाहते आणि मित्र माझ्या गावी कधी येतील ? तो हसीन मोका वर्ष २०१३ ने त्यांना मिळवून दिला. भीमरावांना कृत्यकृत्य होण्याचा क्षण गवसला आणि अखिल भारतीय मराठी गझल सम्मेलन एका लहानशा खेडयात साकारण्याचा इतिहास घडला.

या गझल सम्मेलनात दोन मुशायरे, नवोदितांची गझल गायन मैफिल, गझलविषयीचे विविध परिसंवाद व समारोपाला प्रत्यक्ष गझलनवाज भीमराव पांचाळे दादांची मैफल अशा भरगच्च कार्यक्रमांची मेजवानीच रसिकांना मिळाली. रसिकांची लक्षणीय उपस्थिती या सम्मेलनाच्या यशस्वीतेची ग्वाही देत होती. तसेच आजच्या घडीला गझलची जनमानसात किती जबरदस्त क्रेझ आहे याची साक्ष पटवत होती. गझल अरबी, इराणी-फारशी, उर्दू व हिंदीतून प्रवास करीत मराठीत आली आणि गझलसम्राट स्व. सुरेश भट यांनी गझलेला मराठीत खऱ्या अर्थाने समृद्ध केले. सुरुवातीच्या काळात गझलचा इतका द्वेष केला जायचा की, एका अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनात तर 'गझलचे मराठी भाषेवर आक्रमण' या विषयावर परिसंवाद सुद्धा ठेवला गेला होता. मात्र आज गझलेला डोक्यावर घेतले आहे ते सामान्य माणसांनी, रसिकजनांनी, तरूण पिढीने, मासिकांनी, वृत्तपत्रांनी व संगीतकारांनी. कारण आता गझल म्हणजे फक्त प्रेमिकेशी हितगुज इतकी सीमित न राहता त्यात आता सर्वसामान्यांचं जगणं, त्यांची दु:खे व आधुनिक जगाच्या घडामोडीसुद्धा अंतर्भूत होत आहेत. गझलचा दोन ओळीचा शेर म्हणजे एक स्वतंत्र कविता असते. आणि याप्रकारे एका गझलेत गझलकार वेगवेगळे विषय हाताळत असतो. गझलच्या शेरातील पहिली ओळ एक प्रकारचा दावा असतो, तर दुसऱ्या ओळीत त्या दाव्याची दलील असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास कोणत्याही शेरची पहिली ओळ एक प्रस्तावना असते तर शेरची दुसरी ओळ त्या प्रस्तावनेचा उत्कट असा समारोप असतो. गझलेला आज कोणताही विषय वर्ज्य राहिलेला नाही. गझल सम्मेलनातले विषय अगदी थोडक्यात, खास तुमच्यासाठी...

गझलकार ए.के. शेख यांनी त्यांच्या गझलेत प्रेमातले शल्य अतिशय समर्पकरित्या मांडलं. ते म्हणतात...

तू दिल्या जखमात मी हरवून गेलो,<br>
अन् तुला विसरायचे विसरून गेलो.

झपाटयाने वाढत असलेल्या शहरीकरणाबाबत शायर अनंत नांदूरकर गझलेतून असे व्यक्त होतात..

रानावनात झाल्या वस्त्या उभ्या अधाशी<br>
मरतील पाखरांची आता पिले उपाशी.

साहित्यात सतत दुर्लक्षित्या गेलेल्या बापाची व्यथा मी माझ्या या शेरामधुन अशी मांडली...

जीवनाला लागलेला शाप होतो<br>
मोकळे रडता न आले... बाप होतो.

शायर दिलीप पांढरपट्टे आपल्या गझलेत इतका करारीपणा आणतात की, रसिकांच्या तोंडुन "वाह क्या बात है" अशी उत्स्फूर्त दाद निघाल्याशिवाय राहत नाही.

उडवाच मान माझी माझा नकार नाही<br>
इतकीच शर्त आहे मी वाकणार नाही

नवनवीन खयाल गझलेत येत आहेत. तरुण शायर आबेद शेख म्हणतात-

उद्देश पावलांचा जाणे पुढेच जाणे<br>
हे ध्येय काय आहे थांबायचे बहाणे

शायर डी.एन. गांगन आपल्या शेरात फुलांवर किती सुंदर आरोप करतात बघा-

केली शिकार माझी माझ्याच सद्गुणांनी<br>
काटे कुठेच नव्हते केला दगा फुलांनी

महागाईने सर्वसामान्यांचा मांडलेला छळवाद ए.के. शेख या गझलकाराने अलगद टिपला आहे. तो म्हणतो...

गरीबाच्या लग्नाला नवरी गोरी काय काळी काय<br>
महागाईने पिचलेल्यांना होळी काय दिवाळी काय

काही झाले तरी गझलेचा स्थायीभाव प्रेमातील गुज हाच राहील. माझ्या पुढील शेरातील प्रेमाची अनुभूती निश्चितचं सुखावून जाईल...

शहरात रोज वणवण फिरतो तुझ्या अजूनी<br>
जागर जुन्या स्मृतींचा करतो तुझ्या अजूनी<br>
विसरून मज खरोखर तू जर खुशीत आहे<br>
श्रावण उशीवरी का झरतो तुझ्या अजूनी

गझल मराठी साहित्यात अभिव्यक्तीचं सशक्त माध्यम म्हणून समोर आली आहे तिचं गारूड मराठी रसिकजनांवर चिरंतन राहो अशी प्रार्थना करून शायर सुनिल तांबे यांच्या पुढील शेरावर लेख समाप्त करतो.

श्वास गझल निश्वास गझल<br>
जगण्याचा विश्वास गझल<br>
द्वेषाची दुनिया बदले<br>
माणुसकीचा ध्यास गझल

**-मसुद पटेल**<br>
**कनिष्ठ तंत्रज्ञ, पुसद उपकेंद्र**

## रसीदी टिकट : वादळाच्या अंतर्मनातलं वादळ

“The more you write personal, the more it becomes universal.” असं कुणीतरी म्हटलंय. हे वाक्य आठवण्याचं कारण म्हणजे अमृता प्रीतम यांचं ''रसीदी टिकट'' हे आत्मचरित्र. स्वतःशी प्रामाणिक राहून केलेल्या लिखाणाचा आणखी एक उत्तम नमुना या पुस्तकाच्या रुपानं वाचनात आला याबद्दल स्वतःला भाग्यवान समजत हे लिहित आहे.

अमृता-साहिर-इमरोझ या जगावेगळ्या प्रेमत्रिकोणाबद्दल याआधी ऐकलं होतंच, अशात ''रसीदी टिकट'' हातात आलं आणि त्यांच्या नात्यांमधलं गहिरेपण नव्यानं कळलं. हे पुस्तक वाचताना ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या पंजाबी साहित्यिका-कवयित्री अमृता प्रीतम यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचे निरनिराळे पैलू नव्याने उलगडले.

परछाईयों को पकड़ने वालों!
छाती में जलती हुई आग की
परछाई नहीं होती...

असं त्यांनी सुरवातीलाच लिहून ठेवलंय. यातून त्यांना काय सांगायचंय हे सुरुवातीलाच समजतं पण कमीत कमी शब्दांत स्वतःच्या मनातील भावनांचं गहिरेपण वाचकाच्या मनावर ठसवण्यात त्या यशस्वी होतात, वाचकाला अंतर्मुख करतात हेच लेखिका म्हणून त्यांचं सर्वात मोठं यश आहे.




अमृता ११ वर्षांच्या असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आई मृत्यूशय्येवर असताना आईच्या मैत्रिणीने छोट्या अमृताला देवाकडे प्रार्थना करायला सांगितली. 'लहान मुलांचं म्हणणं परमेश्वर टाळत नाही' असंही आईच्या मैत्रिणीने सांगितलं. त्याप्रमाणे अमृता यांनी तासनतास देवाचा जप केला. तरीही त्यांच्या आईचा मृत्यू झालाच. या घटनेचा त्यांच्या बालमनावर कसा आघात झाला आणि त्यांचं देवाविषयीचं मत कसं बदलत गेलं हे वाचताना आपण हळहळत राहतो.

अमृता लहानपणापासूनच बंडखोर स्वभावाच्या. याचं प्रत्यंतर पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात येतं. त्यांच्या वडिलांच्या मुसलमान मित्रांसाठी घरात तीन वेगळे ग्लास होते. त्या वेगळया ठेवलेल्या ग्लासांमुळं त्यांनी त्यांच्या आजीविरुद्ध बंड पुकारलं. ते तीन ग्लास इतर भांडयांमध्येच ठेवावेत असा हट्ट धरला. पण आजी काही ऐकेना. मग अमृता यांनी जेवण सोडलं. शेवटी प्रकरण अमृता यांच्या वडिलांपर्यंत पोहोचलं. वडिलांनाही आपल्या घरात असं काही होत असेल याची कल्पना नव्हती त्यामुळे तेसुद्धा अमृताच्याच बाजूने उभे राहिले. आणि शेवटी विजय अमृताचाच झाला. हा सारा प्रसंग कथन केल्यावर अमृता लिहितात - ''त्याक्षणी ना आजीला माहित होतं, ना मला की पुढे जाऊन आयुष्याची अनेक वर्षे मी ज्याच्यावर जिवापाड प्रेम करेन तो त्याच धर्माचा असेल ज्या धर्माच्या लोकांसाठी घरातली भांडीही वेगळी ठेवली जात होती.'' या प्रसंगातून साहिर यांचा या पुस्तकात प्रवेश होतो आणि पुढे अनेक प्रसंगांतून अमृता आणि साहिर यांच्यातील नातं उलगडत जातं.

आधीच विवाहित असलेल्या अमृता यांचं चित्रपट गीतकार आणि शायर साहिर लुधियानवी यांच्यावर निरतिशय आणि निस्सीम प्रेम होतं. या असफल प्रेमाचे व्रण मनी वागवतानाच चित्रकार इमरोझ त्यांच्या आयुष्यात आले आणि कायदेशीर लग्नबंधनात न अडकता इमरोझ-अमृता ४० वर्षांनहून अधिक काळ एकमेकांसोबत राहिले. ज्यांना या नात्याला काहीतरी नावच दयायचे आहे, त्यांनी याला हवं तर 'लिव्ह इन रिलेशनशिप' म्हणावं. पण मला स्वतःला हे नातं 'लिव्ह इन'च्या कितीतरी पलीकडचं वाटतं. त्या दोघांनाही एकमेकांच्या सहवासाची एक वेगळीच धुंदी चढली होती. 'रसीदी टिकट' मध्ये अनेक प्रसंग या नात्याबद्दल खूप काही सांगून जातात. गुलजार यांनी अमृता-इमरोझ यांच्या दोस्तीला आख्यायिका म्हटलंय. अमृता-इमरोझ यांचं नातं म्हणजे कविता आणि प्रतिमा यांचं नातं आहे असंही गुलजार म्हणतात. अमृता प्रीतम आज या जगात नसल्या तरी त्या आपल्यासोबतच आहेत असं इमरोझ यांना आजही का वाटतं याचं उत्तर हे पुस्तक वाचल्यावर मिळतं.

एक काळ होता जेव्हा अमृता यांच्या भावविश्वात फक्त आणि फक्त साहिरच होते. अमृता पहिल्या मुलाच्या वेळी गरोदर असताना तो साहिर यांच्यासारखा दिसावा म्हणून त्या सतत साहिर यांचे चिंतन करीत. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे अमृता यांचा मुलगा नवराज हा दिसायला साहिर यांच्यासारखाच आहे. १३ वर्षांचा असताना स्वतः नवराजने त्याच्या आईला म्हणजे अमृता यांना विचारलं होतं 'ममा, मी साहिर अंकलचा मुलगा आहे का?' तेव्हा अमृता यांनी त्याला नाही म्हणून सांगितलं. त्यावर नवराज म्हणाला 'तसं असेल तर सांग, मला साहिर अंकल आवडतात' त्यावर अमृता यांनी त्याला समजावलं 'बेटा, साहिर अंकल मलाही आवडतात, पण तू त्यांचा मुलगा नाहीस' असे सांगतानाच त्यांना 'काश यह सच होता' असंही वाटलं होतं. आपल्या आईचे उत्तर नवराजलाही पटलं. 'रसीदी टिकट' मधला हा आई-मुलाच्या नात्यातला संवाद वाचकाला एक वेगळाच अनुभव देऊन जातो.

साहिर यांच्या मृत्यू झाल्याची बातमी रात्री दोन वाजता अमृता यांना फोनद्वारे समजते त्यावेळी त्यांच्या मनाची जी अवस्था होती तो प्रसंग वाचताना आपल्याही डोळयात पाणी तरळतं.

हे पुस्तक वाचताना अमृता प्रीतम यांची संवेदनशीलता, त्यांचं सामाजिक भान, पंजाबी समाजाकडून त्यांची झालेली अवहेलना, मैत्रीचा त्यांना उमगलेला महिमा, कविता, कादंबऱ्या लिहिताना त्यांच्या मनाची अवस्था, आई म्हणून त्यांच्या मुलांच्या प्रति असलेल्या भावना अशा अनेक गोष्टींचा कोलाज कॅनव्हासवर साकारत असल्याचा भास होत राहतो.

एका बंडखोर, स्वतंत्र विचाराच्या लेखिकेनं स्वतःविषयी केलेले लेखन वाचणे हे खरंतर एखाद्या वादळाला समजावून घेण्यासारखं आहे. म्हणूनच हे पुस्तक वाचताना एखाद्या वादळाच्या अंतर्मनातलं वादळ समजून घेतल्याची अनुभूती येते.

- सचिन ढवण

जनसंपर्क अधिकारी, सांघिक कार्यालय

## देवा, मागणं मंजूर करंच!



जीवन जगताना असंख्य प्रश्न मनात डोकावतात. कधी कधी सुखाच्या क्षणी काही शंका मनात घर करतात तर कधी सत्कार्याचा अंत होताना दिसतो. तेव्हा देवाच्या दारात उभे राहून मी ऐश्वर्य, पैसा, सत्ता, ताकद मागितली नाही तर पुढील मागण्यांची यादीच देवाला देऊन टाकली. देव हसला, अन् म्हणाला ठीक आहे. (देव हसला असं फक्त मला वाटलं बरं का!).

**माझी मागण्यांची यादी -**

१) देवा, देणारच असशील काही तर एक गोष्ट नक्की दे, मी तरुण झाल्यापासून मला हल्ली उगीच असं वाटतं की, मला सगळं कळतं. 'मला सगळं कळत' ही घाणेरडी सवय मला कधीच लागू देऊ नको. त्यापेक्षा मला सतत वाटू दे की, जगात खूप साऱ्या गोष्टी आहेत की, त्या मला येत नाही. त्यासाठी मला आतून जागं ठेव.

२) देवा, ज्याच्या त्याच्या भानगडीत नाक खुपसून गॉसिप करण्याची सवय मला लागू देऊ नको. माझ्या कानाला गॉसिप ऐकण्याची सवय होऊ देऊ नकोस. जरी झाली तर माझा जोरात कान धर.

३) देवा, मला विचार करून काम करण्याची सवय लागू दे. पण ते करताना मला मूडी बनवू नकोस. मूड असेल तर काम करीन, नाही तर नाही अस न करता मला सातत्य दे. मी म्हणेन तसंच होऊ दे अशी हुकुमशाही माझ्या मनाला शिवु देऊ नको.

४) देवा, हलका कर माझ्या मनावरचा भार! कोण मला काय बोललं, कुणी माझा कसा अपमान केला हे सर्व मी माझ्या मनातच ठेवतो. त्यामुळेच माझं मन व्यापून जातं. मग त्या मनात प्रेम, मैत्री, माणुसकी यांना जागा फार कमी पडते. म्हणून मोकळी कर मनातली जागा. माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याचं व माणूस म्हणून जगण्याचं बळ दे मला.

५) देवा, मला जीवनात उंच भरारी घेण्याचं बळ दे. धोका पत्करून माझ्या क्षमतांच्या पल्याड जाण्याची ताकद दे. पण देवा, माझं जमिनीवरचं प्रेम कधी कमी होणार नाही याची मला जाणीव करून दे. मला कळू दे, की जेवढे आकाशात उडणं महत्वाचं असतं तेवढंच महत्वाचं आहे जमिनीत खोल रूजणं.

६) देवा, मला माझ्या दुःखाचं भांडवल करण्याची सवय नको लागू देऊ! जगात मीच एकटा कसा दुर्दैवी आहे, मलाच कसं दुःख आहे असं रडगाणं गात जगणं नकोय मला! माझ्या दुःखातही मी दुसऱ्याच्या दुःखावर फुंकर घालू शकेन, माझ दुःख विसरून आनंदाने जगण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा दे मला.

७) देवा, माझ्यापेक्षा इतरांची दुःख खूप मोठी आहेत हे मी कायम लक्षात ठेवावं आणि माझा शत्रू जरी दुःखी झाला तरी त्याच्या यातना पाहून मला आनंद होऊ नये एवढंच मागणं.

८) देवा, मला चांगली स्मरणशक्ती दे, तसेच चांगली विसरशक्ती ही दे, कारण माझ्यासोबत जे वाईट झालं, मला जे दुःख मिळालं, मला ज्यांनी फसवलं हे सर्व विसरण्यासाठी 'विसरशक्ती' दे. पण या सर्वांतून जे मला अनुभव मिळाले ते निरंतर स्मरणात राहावे म्हणून चांगली स्मरणशक्ती दे.

९) देवा, खूप रट्टे घाल माझ्या पाठीत. कारण मी चुकतोच रे सारखा. माफ नको मला, माझे अपराध अजिबात पोटात घालू नको. त्यापेक्षा मला चांगली अद्दल घडव. त्यामुळे त्या चुका सुधारून चांगल आयुष्य जगण्याची संधी दे मला. माझ्या हातून चुका होऊच नये असंही मी म्हणणार नाही कारण मी चुकतंच शिकेन. पण झालेली चूक कबूल करण्याची आणि ती सुधारून त्यासाठी माफी मागण्याचं बळ नक्की दे.

७) देवा, जगात सर्वच माणसं सारखी नसतात. सर्वच चांगली माणसं सदासर्वदा चांगली नसतात, तर सर्वच वाईट माणसं सदासर्वदा वाईट नसतात. हे चांगल्या प्रकारे कळु दे मला. वाईटांचेही चांगले गुण आत्मसात करण्याची मला ताकद दे.

८) देवा, आता एकच शेवटचं मागतो. देवा मला संतही बनवू नको, आणि राक्षसही बनवू नको. मला साधा सामान्य माणूसच राहू दे. मी माणसासारखाच माणुसकी जपत जगेन. पण माणूस म्हणून मी भरकटलो तर देवा मला अशी अद्दल घडव की, इतरांनाही कळेल की 'माणूस' होण्याची जबाबदारी निभावणं किती कठीण असतं ते. देवा एवढं दिलं तरी मी माझी जगण्याची रोजची लढाई लढेन आनंदानं.

-अमोल अ. इंगोले (क. तंत्रज्ञ)
१३२ के.व्ही. उपकेंद्र, वरूड (अमरावती)

## एका त्या क्षणी



भेटलास एका त्या क्षणी असा
सारी स्वप्नं जागी झाली
नाजूक हळव्या ओंजळीने
तुलाच भरून घ्यायला लागली

बोललास एका त्या क्षणी असा
वाटलं जग इथेच थांबावं
वाऱ्यानेही किंचित मान वळवून
आपल्या मनीचं गूज जाणावं

हसलास एका त्या क्षणी असा
प्राजक्ताचा सडा अंगणी पडला
तुझ्यासह जोडीने फिरताना
त्याचाच सहवास जाणवला

हसवलंस एका त्या क्षणी असं
डोळ्यातलं पाणी उडून गेलं
तुझ्या मायेच्या शब्दांनी
तेही घाबरून पळून गेलं

होशील माझा एका त्या क्षणी असा
मी सर्वांगी मोहरून जाईन
सुखाच्या मोरपिसावरून फिरताना
तुझ्या संसारात रंगून जाईन

-कु. एस.आर. रेवतकर (यंत्रचालक)
१३२ के.व्ही. उपकेंद्र, कोयना रोड, लातूर

## ''माइंड गेम'' - एक अनुभव



आयुष्य जगत असताना काही घटना अनपेक्षितपणे घडतात आणि कटू-गोड आठवणींचे ठसे ठेवून जातात. माझ्याही आयुष्यात अशा काही घटना घडल्या ज्यांनी माझ्यापुढे अनुभवाचे नवीन दालन उघडले. अशाच एका अनुभवाचे हे लिखित रूप-

कंपनीच्या नाट्यस्पर्धेत भाग घेण्याची इच्छा तर त्या दिवसापासून होती जेव्हा कंपनीच्या सेवेत रूजू झाल्यानंतर पहिल्यांदा नाट्यस्पर्धेत एक नाटक पाहण्याचा योग आला होता. ती इच्छा लवकरच पूर्णही झाली. दुसऱ्याच वर्षी आमच्या स्थापत्य मंडल, ऐरोलीतर्फे नाटकात काम करण्याची संधी मिळाली. भूमिका छोटीशीच होती, पण अभिनयाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यानंतर मात्र नाटकात काम करायचे नाही असे मनाशी ठरवून टाकले कारण कार्यालयीन काम आणि तालमीची कसरत करणे पुन्हा शक्य नव्हते.

पण म्हणतात ना, आपण ठरवतो एक आणि घडते मात्र वेगळेच. नाटकात भाग घ्यायचा नाही असे ठरवले असताना नेमकी प्रमुख भूमिका माझ्या वाटयाला आली. सुरुवातीचे काही दिवस तर मी टंगळमंगळच करत होते परंतु माझे सहकलाकार संतोष कडलग, कैलास वाघ, रोहित साबळे आणि डॉ. प्रधान यांनी खूप आग्रह करुन आणि सहनशीलपणे मला नाटकात काम करण्यासाठी प्रोत्साहित केले.

बहिणीच्या अपघाती निधनाने मानसिक तणावाला बळी पडलेल्या लेखकाच्या गर्भवती पत्नीची भूमिका करायची होती. आपल्या पत्नीला ती आपली बहिण आहे असे समजून तिचा विवाह करून देण्याच्या प्रयत्नात असलेल्या नवऱ्याला आधार देऊन त्याला बरे करण्यासाठी धडपडणारी स्त्री साकारणे खरे तर एक आव्हानच होते. पण जसजशा तालमी होत होत्या, तसतशी मी ''प्रेरणा''ला समजू लागले. तिची तगमग, तिची अगतिकता कळू लागली आणि भूमिकेच्या जवळ जात गेले.

तालमीच्या वेळी एकमेकांशी भांडणे, एकमेकांची मस्करी करणे, एकत्र जेवणे या गोष्टी नित्याच्या होत्या. थोडक्यात सांगायचे तर, एका गंभीर विषयावरचे नाटक करत असतानासुद्धा आम्ही खूप धमाल केली.

तालमी तर झाल्या. आता खरी परीक्षा होती ती नाटक प्रेक्षक व परीक्षकांपुढे सादर करण्याची. सगळेच मनातून खूप घाबरलो होतो कारण एक वेगळा विषय, चारपात्री नाटकातून लोकांपर्यंत व्यवस्थित पोहोचवायचा होता. शाळेत असताना परीक्षेच्या वेळेला जी अवस्था असायची, त्याची आठवण झाली.

नाटकाची तिसरी घंटा झाली, पडदा उघडला आणि सर्वजण 'स्व' विसरून नाटकाशी, त्यातील पात्रांशी एकरूप झालो. खरंच, रंगमंचावर प्रेक्षकांसमोर अभिनय करणे हा एक असा अनुभव आहे जो शब्दांत मांडणे केवळ अशक्य आहे. आयुष्यात काही गोष्टी फक्त अनुभवायच्या असतात हेच खरे.

आमचे नाटक प्रेक्षक व परीक्षकांच्या पसंतीस उतरले. नाटकाला लोकांची वाहवा मिळाली आणि प्रयत्नांचे सार्थक झाल्यासारखे वाटले. निकालाच्या दिवशी अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळाले तेव्हा तर आकाश दोन बोटं उरल्यासारखे वाटू लागले.

माइंड गेम या नाटकाने मिळालेला अनुभव आठवणींच्या गाठोडयात कायमचा राहणार आहे.

-नूरी पाल

निम्नस्तर लिपिक, ऐरोली

## वहाण



कुणी पुजती मजला देव्हाऱ्यात
कुणी मजला सोडती उंबरठ्यात

कुणी धन्य होती मज लावून माथ्याशी
कुणी म्हणती माझी जागा पायथ्याशी

डोंगरदऱ्यातुन जाणारा असो तो घाट
असो ती माझ्यात रूतणाऱ्या काट्याची वाट

जन्मोजन्मी सांभाळतेय मी चरणांचा भार
पाऊलांसवे सदैव घालतेय मी येरझार

निखाऱ्याची धग मीच सोसणार
चरणांची कुरूपं मीच रोखणार

मंदिरी पुजती मज कुणी पादुका म्हणून
जंगलात तुटते मी कधी जोडा बनून

माझ्या पाऊल ठशांनी उलगडे गूढ
कुणास मारून मला उगवलेत सूड

केले बदनाम मज कुणाच्या गळयात बांधून
केला अपमान मज कुणावर भिरकावून

माझा कुणा हातून होई सन्मान कधी अवमान
नित्य चरणांसवे असेल मी बनून 'मजबूर' वहाण

- संतोष राजाराम झुंजारे (सहाय्यक यंत्रचालक)

१३२ केव्ही, उपकेंद्र, अकोला अमरावती

## आवाहन

प्रिय वाचकहो,

महापारेषण समाचारच्या पुढील अंकासाठी परिमंडलात संपन्न झालेले महत्त्वपूर्ण कार्यक्रम, तांत्रिक घडामोडी, कंपनीतील कर्मचाऱ्यांनी अथवा त्यांच्या पाल्यांनी मिळविलेले यश आदी बातम्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरीने महापारेषण समाचारच्या पत्त्यावर पाठवाव्यात.

Email: prohr@mahatransco.in

## नविन वर्ष



जसे गढूळपणाला हमखास निवळावे लागते
तसे उगवत्यालाही हमखास मावळावे लागते
जुने जेव्हा खंगत असते, तेव्हा नवे कुणी रांगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

वर्ष, महिने, दिवस असे आपण टप्पे पाडतो
तास, मिनिट, सेकंदासारखे सोईनुसार कप्पे जोडतो
काळाची खेळी तेव्हा अनंतात रंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

आशेला लागूनच निराशाही येत असते
आपल्या स्वैर स्वप्नांची अचूक दिशा देत असते
एकाचे यशस्वी होते तेव्हा दुसऱ्याचे भंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

नवा नसतो सूर्य, प्रकाशही नवा नसतो
कॅलेंडरच्या फडत्काराने आपल्याला नवा भासतो
कुणी करतो संकल्प कुणी नशेत झिंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

गेलेली संधीही पुन्हा परत आणता येते
आत्मविश्वासाच्या बळावर भविष्यही जाणता येते
वर्तमानाला विसरून कुणी भूतकाळात रंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

नव्याला सामोरे जाताना जुन्याला थारा नको
पूर्वेच्या स्वागताला पश्चिमेचा वारा नको
आपला गंध आपल्याला कळावा, जरी गाय वासराला हुंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

कोणताच माणूस कधी आनंदासाठी भांडत नाही
त्याच्याशिवाय मनातला कचरा बाहेर सांडत नाही
मोकळया मनाने भांडले की, शत्रुत्व भंगत असते
नवे वर्ष आपणाला हेच तर सांगत असते

**-श्री. कचरू वामन ढवळे (शिपाई)**
**अउदा बांधकाम मंडल, औरंगाबाद**

## सत्कर्म

का भुलतोस मानवाचा धर्म ?
कराया भीत नाहीस पाप-कर्म

निष्पाप बनतात तुझी शिकार
जागे व्हा करण्या दानवाचा धिक्कार

जातो त्यात अल्पवयीनांचा बळी
तोडतोस फूल उमलण्याआधीच कळी

राक्षसी वृत्तीने निष्ठूर झाले तुझे मन
ऐकून वाईट खबरी सर्वांचे होतात सुन्न कान

जगण्याची खूप इच्छा-आकांक्षा असते पुढे
अशा पातकांना गिरविण्या लावा मरणाचे धडे

अमिषापोटी बनतात तुझ्या दासी
कधी खून तर कधी मिळते फासी

मार्ग अवलंब अहिंसेचा नको सोडू धर्म।
मन स्थिर ठेवून नित्य कर सत्कर्म।।

**- वसंत मस्के**
**१३२ केव्ही उपकेंद्र हिंगोली, विभाग-परभणी**

## वेदना



जिंदगी माझी जरी बेकार होती
वेदनेला केवढा आधार होती
ऐकली ना हाक या बहिऱ्या जगाने
या मुक्याची हीच बस तक्रार होती
सोडल्यावर तत्त्व सारे जिंकलो मी
पण खरे तर तीच माझी हार होती
भेट झाली ना कधी मानव्यतेशी
माणसे तर भेटली चिक्कार होती
ठेवले मेघास मी डोळ्यात माझ्या
आसवे कुठवर मला पुरणार होती
बेदखल झाली बिचारी पाखरे ती
जंगलाची जी खरी हकदार होती
शेवटी मृत्यूच आला वाचवाया
जिंदगी तर आणखी छळणार होती

**-मसुद पटेल**
**कनिष्ठ तंत्रज्ञ, पुसद उपकेंद्र**

## वरिष्ठ यंत्रचालकाच्या तिन्ही मुली डॉक्टर

आपल्या पाल्यांनी उच्चशिक्षण घेऊन समाजासाठी-देशासाठी योगदान द्यावे असे स्वप्न प्रत्येक पालक पाहत असतात व ते साकारण्यासाठी प्रयत्नशीलही असतात. महापारेषण कंपनीच्या कर्मचाऱ्यांमध्येसुद्धा हीच भावना आहे व स्वप्न साकारण्याची जिद्दही.

श्री.दत्तात्रय हरीभाऊ साबळे हे १९८३ मध्ये तत्कालीन म.रा.वि. मंडळात कनिष्ठ यंत्रचालक पदावर रुजू झाले. सध्या ते अउदा संवसु बाभळेश्वर विभागांतर्गत १३२ केव्ही शेवगाव उपकेंद्र येथे वरिष्ठ यंत्रचालक पदावर कार्यरत आहेत.

सेवेत असताना अपरिहार्य असलेल्या बदल्या, मर्यादित आर्थिक उत्पन्न या व अशा अनेक अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या तीनही मुलींना उच्च शिक्षित करण्याचा ध्यास घेतला. यात त्यांना त्यांच्या पत्नीची उत्तम साथ लाभली. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिन्ही मुलींनी केलेले कष्टही तेवढेच कौतुकास्पद आहेत.



श्री.साबळे यांची मोठी कन्या कु.ज्योती ही पुण्याच्या नामांकित बी.जे. मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पदवी मिळवून सध्या मुंबई येथे एमडी करीत आहे. स्त्रीरोग हा तिच्या अभ्यासाचा विषय आहे. दुसरी कन्या कु.स्वाती हिने अहमदनगर येथील गुणे आयुर्वेद महाविद्यालयातून बीएएमएस पूर्ण केले असून सध्या एमडी अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी प्रयत्नशील आहे. श्री. साबळे यांची तिसरी व सर्वात लहान कन्या कु.सोनाली हिने मुंबई येथील सेंट जॉर्ज वैद्यकीय महाविद्यालयातून बीडीएस पदवी मिळवली असून एमडी करण्यासाठी सीईटी परीक्षा देत आहे.

सध्याच्या काळात मुलगाच हवा असा अट्टाहास सर्वत्र दिसत असताना श्री. साबळे यांनी तीनही मुलींना वैद्यकीय क्षेत्रातील उच्चशिक्षण देण्यासाठी श्री.साबळे कुटुंबियांनी केलेली धडपड नक्कीच कौतुकास्पद आहे. याची दखल पुण्यातील दैनिक सकाळ या वृत्तपत्रानेदेखील घेतली आहे.

साबळे दाम्पत्याचे मन:पूर्वक अभिनंदन त्यांच्या मुलींच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!!

## ऋषिकेश देशपांडे यांना पीएचडी



सांघिक कार्यालयात महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर कार्यरत असलेले श्री.ऋषिकेश विठ्ठलराव देशपांडे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच पीएचडी पदवी प्रदान केली. डॉ.जितेंद्र अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.देशपांडे यांनी 'अ स्टडी ऑफ पर्सनल इन्कम टॅक्स स्ट्रक्चर इन इंडिया विथ स्पेशल रेफरन्स टू सिलेक्टेड डिस्ट्रिक्टस इन महाराष्ट्र' या विषयावर प्रबंध लिहिला आहे.

मूळचे अंबाजोगाईचे रहिवासी असलेल्या श्री.देशपांडे यांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीवर मात करीत वाणिज्य शाखेची पदवी मिळविली. त्यानंतर त्यांनी एम कॉम, डीबीएम, एमबीए या पदव्या मिळवित शिक्षण सुरु ठेवले. सुरुवातीला नगरपालिकेच्या जकात विभागात अटेंडंट म्हणून त्यांनी करिअर सुरु केले आणि आपल्या जिद्दीच्या जोरावर अनेक पदव्या मिळवल्या. श्री.देशपांडे १९७७ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात लिपिक म्हणून रुजू झाले व त्यानंतर विविध पदांवर काम करत ते सध्या महापारेषण कंपनीत महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर कार्यरत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. लोखंडे, नाशिकचे डॉ. खैरनार, जालना येथील डॉ. अहिरराव यांच्या उपस्थितीत श्री.देशपांडे यांनी आपला प्रबंध सादर केला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## पवनकुमार बढे व्हिएन्नातील भारतीय दूतावासात सचिवपदी रुजू





श्री. पवनकुमार तुळशीदास बढे (I.F.S.) यांची व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) येथील भारतीय दूतावासात तृतीय सचिव या पदावर नुकतीच नियुक्ती झाली. पवनकुमार हे अउदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभाग जळगाव येथे कनिष्ठ अभियंता (स्था.) या पदावर कार्यरत असलेल्या श्री.तुळशीदास केशव बढे यांचे सुपुत्र आहेत.

श्री. बढे यांच्या स्नुषा सौ. कीर्ती पवनकुमार बढे या आयआयटी खरगपूरच्या पदवीधर असून त्यांनी एम.टेक. (सिटी प्लॅनिंग) केले आहे. त्या व्हिएन्ना येथे (CEMDS) Centre for Environmental Management and Decision support या ऑस्ट्रियन कंपनीत काम करत असून त्या मध्य प्रदेशातील भोपाळ, रायसेन, खजुराहो या शहरांचे सिटी प्लॅनिंग व सॅनिटेशन डेव्हलपमेंट प्रोजेक्टवर काम करीत आहेत. बढे दाम्पत्याच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन.

## वैभव गायकवाडला राज्य पुरस्कार प्रदान



चि. वैभव अशोक गायकवाड हा इयत्ता दहावीमध्ये जीवन विकास मंदिर, शिरूर येथे शिकत आहे. त्याला २०११-१२ यावर्षी 'महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड यांचेतर्फे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले 'राज्य पुरस्कार प्रमाणपत्र' प्रजासत्ताक दिनी म्हणजेच २६ जानेवारी २०१३ रोजी शिरुर येथील शाळा प्रशासनातर्फे प्रदान करण्यात आले. याप्रसंगी शाळेतर्फे त्याचा सत्कारही करण्यात आला. चि. वैभव हा श्री. अशोक दादा गायकवाड यांचा मुलगा आहे. श्री. अशोक गायकवाड सध्या १३२ केव्ही उपकेंद्र, शिरूर जि. पुणे येथे वरिष्ठ यंत्रचालक या पदावर कार्यरत आहेत.

## सूरज महाडिक यांचा मुंबई मॅरेथॉनमध्ये ध्वनिमुद्रक म्हणून सहभाग



२० जानेवारी २०१३ रोजी संपन्न झालेल्या दहाव्या स्टॅण्डर्ड चार्टर्ड मुंबई मॅरेथॉनमध्ये श्री. सूरज शशिकांत महाडिक यांनी ध्वनिमुद्रक म्हणून सहभाग नोंदवला. श्री. महाडिक यांनी बीबीसीसाठी ध्वनिमुद्रकाची भूमिका पार पाडली. सूरज महाडिक हे संचालक (प्रकल्प) यांच्या कार्यालयातील सचिव-लघुलेखिका सौ. शीतल महाडिक यांचे सुपुत्र आहेत.

## श्रीकांत पेटकर यांच्या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचे अनुदान



श्री.श्रीकांत पेटकर, यांच्या ''इंद्रधनुष्य'' या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे नवलेखक अनुदान योजनेत अनुदान प्राप्त झाले आहे.

श्री.पेटकर हे अति उच्चदाब संवसु विभाग डोंबिवली अंतर्गत २२० केव्ही वाशाळा उपकेंद्र येथे उपकार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहेत.

श्रीकांत पेटकर यांना लिखाणाची आवड शालेय जीवनापासूनच आहे. नोकरी सांभाळून त्यांनी ती आवड आताही जोपासली आहे. कार्यालये, घराच्या आसपासचा परिसर, नोकरीची ठिकाणं या व इतर ठिकाणी त्यांना जे जे अनुभव आले ते त्यांनी इंद्रधनुष्य या कथासंग्रहात शब्दबद्ध केलेत. अशाच काही अनुभवांना वर्तमानपत्रात प्रसिद्धी देखील मिळाली आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मिळालेल्या अनुदानाबद्दल श्री.पेटकर यांचे अभिनंदन व त्यांच्या पुढील वाटचाली साठी शुभेच्छा!

## अशोक साळुंखे यांना गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्रदान



श्री.अशोक साळुंखे यांना पुरस्कार प्रदान करताना कामगार राज्यमंत्री श्री.राजेद गावित व इतर मान्यवर

सांघिक कार्यालयात उच्चस्तर लिपिक (मानव संसाधन) या पदावर कार्यरत असलेल्या अशोक नानाजीराव साळुंखे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा 'गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार २०१२' नुकताच प्रदान करण्यात आला. कामगार राज्यमंत्री श्री. राजेंद्र गावित यांच्या हस्ते श्री. साळुंखे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी श्री. साळुंखे यांचा सपत्नीक सत्कारही करण्यात आला.

श्री. साळुंखे २८ वर्षांपूर्वी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात रुजू झाले. कंपनीच्या कला व क्रीडाविषयक तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ते नेहमीच अग्रेसर असतात. श्री. साळुंखे भारतीय कामगार सेनेच्या महापारेषण युनिटचे उपसरचिटणीसही आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

## सूचना

**महापारेषण समाचारसाठी मजकूर पाठवताना तो कृपया मोजक्या व समर्पक शब्दांत पाठवावा. छायाचित्रे दर्जेदार असावीत. मजकूर इंग्रजीत असल्यास तो ओपन फाईलमध्ये व मराठीत असल्यास पीडीएफ स्वरूपात खालील ई-मेलवर पाठवावा.**

**prohr@mahatransco.in**

## Leading through adopting to best practices

The difference between ordinary and extra-ordinary is that little word extra. In order to lead a distinguished success one should take extra efforts or go extra mile which will distinguish him from others. That extra effort has to be best in class or world class in right direction. I have seen cases of vision-action mismatch. In modern time it is required to put smart efforts not mere hard work. Actions should be properly aligned to the Vision, Mission and Objectives. Same applies to the organization. Why some organization stands out, it is merely because their business processes are best in the class and well aligned to vision, mission and objectives.

There is misnomer that to be best in the class, it is required to incur huge expenses. But it is not necessary. It is required to have strong drive and determination that our way of working would be best among the lot and there would not be any scope for complacency. Critical evaluation of our method of working is the base for creating culture of best practices. We must not have "Frog in the Well" mentality and must be open and broad minded to know what all good things happening around us. For that matter we need to be explorative, inquisitive and first and foremost open for critics and suggestions.

Power Sector is getting seamlessly integrated in the modern era. Changes are happening at all fronts as the sector is liberalizing. Our best may become outdated in no time, therefore one has to have eye on what development is happening in business processes. I am aware that we can not merely do cut, copy, paste, as no identical problem would have identical solution, such that everyone is culturally different. However we must develop ability to find out what is best for our system and process, keeping in mind Vision, Mission and Objectives.

Finding is one thing and acting on it, is another. Many are good in talking but organization need doers. I understand that there are many barriers in execution. But that is why organization employs us as managers, whose work responsibility is to convince and get work done systematically. I think if the manager takes it up as a team work and involve his seniors, it helps in becoming common voice and in that case convincing becomes easy. There are other ways also to seek support of management. One must know that Management wants to have good proposals which will give organization cutting edge, however it has to be seen from value-cost proposition. Management is always inclined to take organization towards excellence, every action, small or big matters to the Management.

I think it is sole responsibility of our Head of the Department to imbibe the culture of best practices, as change does not come from down, it always comes from the top. As the apex body, HoD is responsible to push his benchmark and earn reputation for the organization. He is supported by his team; he must identify resources among his team who could take this work forward. The HoD has to provide guidance, resources and support so that he always remain best in the class for his areas of activities. Recently MSETCL has taken new initiative where our HRD Department organizes exposure visits of our Senior Officer with Senior Officers of M/s Powergrid Corporation, New Delhi. In this visit technical know-how, best Operations and Projects practices, best practices of Finance and Accounts and proactive approaches of Human Resources are shared. Powergrid being central transmission utility compares with World Transmission utilities, therefore benchmarking with Powergrid indirectly benchmark with World Transmission Utilities.

Sum total of individual performance is organization's performance; hence we must stand apart in our own way to make our organization a leading organization. Remember that "Belief is a prerequisite for success".

संपादक : श्री.सचिन ढवण, जनसंपर्क अधिकारी
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,
Printed at Hema Arts : 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.